सुविचार
चमत्कार हे नेहमी मेहनत करणाऱ्या माणसाच्या आयुष्यात होतात.

साप्ताहिक
अधिकारनामा

Email : adhikarnama2021@gmail.com
Web : www.adhikarnama.in

'अधिकारनामा' या साप्ताहिक साठी जिल्हा आणि तालुका प्रतिनिधी नियुक्त करायचे आहेत. इच्छुकांनी संपर्क करावा. मो. 9665382780, 9766382780

मुख्य संपादक : निलेश बा. किरतकार मो. ९६६५३८२७८०, ९७६६३८२७८०
कार्यालय : साप्ताहिक अधिकारनामा, गाडगे नगर, अमरावती – ४४४६०३

अकोला * बुधवार दि. ०६ जुलै २०२२ * वर्ष २ रे * अंक १४ * किंमत २ रुपये * RNI Title Code No. : MAHMAR50842

भाजपाच्या द्रौपदी मुर्मू यांना पाठिंबा द्या
शिवसेना खासदाराचे उद्धव ठाकरेंना पत्र

साप्ता. अधिकारनामा

मुंबई : एकनाथ शिंदे यांनी मविआ नको म्हणत भाजपासोबत जाण्यासाठी बंड पुकारल्याची घटना ताजीच असताना आता राष्ट्रपती निवडणुकीवरून शिवसेना खासदाराने भाजपाच्या उमेदवाराला पाठिंबा देण्याची मागणी केली आहे. तसे पत्रच त्यांनी थेट पक्ष प्रमुख उद्धव ठाकरेंना पाठविल्याने राजकारणात पुन्हा एकदा खळबळ उडाली आहे. १८ जुलै २०२२ रोजी देशाच्या राष्ट्रपती पदाची निवडणूक होणार आहे. या पदासाठी यशवंत सिन्हा आणि द्रौपदी मुर्मू हे दोन उमेदवार उभे आहेत. मुर्मू या आदिवासी समाजातील असून सामाजिक क्षेत्रात त्यांचे बहुमुल्य योगदान आहे. त्यांनी शिक्षिका म्हणून सुरुवात केली व त्यानंतर अरोबिंदो इंटीग्रल एज्युकेशन ॲन्ड रिसर्च इन्स्टीट्यूट, रायंगपूर येथे सहाय्यक

प्रबंधक म्हणून काम केले आहे. या नंतर त्या ओडीसा सरकारच्या सिंचन विभागात कनिष्ठ सहायक या पदावर कार्यरत होत्या. द्रौपदी मुर्मू यांनी झारखंडच्या राज्यपाल म्हणून महत्वाची कामगिरी सुध्दा पार पाडलेली आहे, असे शिवसेना खासदार राहुल शेवाळे यांनी पत्रात म्हटले आहे.

बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसेना-भाजप युती असताना एन.डी.ए. च्या उमेदवाराला पाठिंबा न देता प्रतिभाताई पाटील या महाराष्ट्रातील असल्या कारणाने त्यांना पाठिंबा दिला होता. प्रणव मुखर्जी यांना देखील त्यांनी असाच पाठिंबा दिला होता. मुर्मू यांची पार्श्वभूमी व सामाजिक क्षेत्रातील कार्य लक्षात घेता आपण मुर्मू यांना पाठिंबा दयावा व तसे आदेश सर्व शिवसेनेच्या खासदारांना द्यावेत, अशी मागणी करत असल्याचे शेवाळे म्हणाले. आता यावर उद्धव ठाकरे भाजपा प्रणित आघाडीच्या उमेदवाराला मतदान करण्यास सांगतात का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपले आमदार मुर्मू यांना मतदान करतील असे कालच म्हटले होते. यामुळे खासदार कोणाला मतदान करतात, यावर सारी गणिते अवलंबून असणार आहेत.

दुकानात आढळले वन्यप्राण्यांचे अवयव

साप्ता. अधिकारनामा

नाशिक : शहरातील रविवार कारंजावरील सुप्रसिद्ध दगडू तेली चांदवडकर यांच्या तिसऱ्या क्रमांकाच्या दुकानात पश्चिम वनविभागाच्या नाशिक वनपरिक्षेत्राच्या पथकाने धाड टाकली. या कारवाईत दुकानातून मोठ्या प्रमाणात घोरपडीचे लिंग (हातजोडी), साळींदरचे काटे, बारशिंगा, चौसिंगासारख्या हरणांच्या शिंगांचे तुकडे आदी अवयव पथकाने जप्त केले आहेत. वन विभागाच्या या कारवाईने बाजारपेठेत खळबळ उडाली आहे. याप्रकरणी वन्यजीव कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रविवार कारंजा बाजारपेठेत तेली गल्लीमध्ये सुखलाल दगडु तेली चांदवडकर यांच्या मालकीचे

सुकामेवा, काष्ट औषधी, वनौषधी विक्रीचे तीसऱ्या क्रमांकाचे दुकान आहे. या दुकानात काही वन्यजीवांचे अवयवदेखील बाळगण्यात आले असून त्याची चोरी-छुप्या पद्धतीने विक्रीही केली जात असल्याची गोपनीय माहिती वनविभाग नाशिकच्या पथकाला मिळाली. त्यानुसार पथकाने खात्री पटविली आणि वनक्षेत्रपाल विवेक भदाणे, इगतपुरीचे केतन बिरारीस यांनी त्वरित पथक तयार करुन सोमवारी (दि.४) संध्याकाळच्या सुमारास छापा टाकला. यावेळी दुकानाच्या झडतीसत्रात काही खोक्यांमध्ये व बाटल्यांमध्ये वन्यप्राण्यांचे अवयव वनाधिकारी, कर्मचाऱ्यांना आढळून आले. त्यामुळे संशयित सुखलाल चांदवडकर यांच्याविरुद्ध वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२च्या विविध कलमान्वये वनक्षेत्रपाल नाशिक यांच्या कार्यालयात मंगळवारी सकाळी गुन्हा दाखल करण्यात आला. दरम्यान, चांदवडकर यांना चौकशीसाठी वनकार्यालयात आणण्यात आले असून या गुन्ह्याची चौकशी व पुढील तपास पूर्ण होईपर्यंत दुकान कुलुपबंद ठेवण्याचे आदेश देण्यात आल्याची माहिती भदाणे यांनी दिली.

पतीचे दुसरे लग्न रोखण्यासाठी पोहोचली पत्नी

साप्ता. अधिकारनामा

कानपूर : उत्तर प्रदेशातील कानपूर ग्रामीण भागात दुसरे लग्न करण्यासाठी जाणाऱ्या पतीला रोखण्यासाठी पत्नी आपले वडील आणि बहिणीसोबत पोहोचली, तेव्हा पतीने आपल्या कुटुंबीयांच्या मदतीने त्यांना लाठ्या-काठ्यांनी बेदम मारहाण केल्याची घटना घडली. दरम्यान, पत्नीच्या कुटुंबीयांनी मारहाणीचा व्हिडिओ बनवला आहे. पती आणि त्याच्या भावांनी केलेल्या मारहाणीत पीडित महिला व तिचे वडील गंभीर जखमी झाले आहेत. या दोघांनाही त्यांच्या नातेवाईकांनी रुग्णालयात दाखल करून पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. यानंतर पीडितेने नातेवाईकांसह जिल्ह्याच्या पोलिस अधीक्षकांकडे न्यायाची मागणी करत त्यांचे कार्यालय गाठले. यावेळी एएसपींनी पीडितेला न्याय देण्याचे आश्वासन दिले आहे. हे प्रकरण गजनेर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गोगुमाळ गावचे आहे. पीडितेचे वडील कमलेश यांनी सांगितले की, २०१८ मध्ये त्याची मोठी मुलगी वर्षा हिचे लग्न गोगुमाऊ येथील रहिवासी राघवेंद्रसोबत केले होते. जेव्हा तिच्या मुलीला मुलगी झाली, तेव्हा तिचा पती राघवेंद्र तिला सोबत घेऊन गेला नाही आणि पैशाची मागणी करू लागला.

पीडितेच्या वडिलांनी सांगितले की, तेव्हापासून मुलगी त्यांच्यासोबत राहत होती, मात्र जाव इ गु ाचू प पुन्हा ल ग ा. करणार असल्याचे नातेवाईकांकडून समजले. मी मुलीसह तेथे पोहोचल्यावर सासरा कल्लू, मेव्हणा वीरेंद्र, पती राघवेंद्र, दीर सुरेंद्र आणि सासूने मारहाण केली. याचबरोबर, राघवेंद्रचा मोठा भाऊ वीरेंद्र यानेही पहिली पत्नी आणि मुले असतानाही दुसरे लग्न केले होते. पोलीस ठाण्यात तक्रार केली,

सासरच्या मंडळींकडून मारहाण

मात्र कोणतीही सुनावणी न झाल्याने एसपी कार्यालय गाठले, असे पीडितेच्या वडिलांनी सांगितले. माझ्या लहान मुलीने वर्षा हिचा नवरा, मेव्हणा, दीर यांनी लाठ्या-काठ्यांनी मारहाण करत असल्याचा व्हिडिओ बनवला, जो तिने एसपींनाही दाखवला आहे. व्हिडिओ पाहिल्यानंतर एसपींनी आरोपींवर कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे, असेही पीडितेच्या वडिलांनी सांगितले. दरम्यान, या प्रकरणी एएसपी घनश्याम चौरसिया यांनी सांगितले की, महिला गजनेर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गोगुमाऊ गावात आपल्या सासरच्या घरी गेली होती, पीडितेच्या आरोपावरून दोघांना तुरुंगात पाठवण्यात आले आहे. वैद्यकीय अहवाल आल्यानंतर पुढील कारवाई केली जाईल. पीडितेला न्याय मिळेल, दुसऱ्या लग्नाबाबत तक्रार आल्यानंतर नियमानुसार कारवाई केली जाईल.

हलगीच्या तालावर आमदार शहाजी बापूचं स्वागत, फटाके उडवून गावी जल्लोष

साप्ता. अधिकारनामा

सोलापूर : शिवसेनेतील बंडखोर आमदार शहाजी बापू पाटील यांचा आपल्या कार्यकर्त्याशी फोनवरुन झालेला संवाद तुफान व्हायरल झाला होता. गुवाहाटीत असताना त्यांनी रफीक नावाच्या नगरसेवकाला केलेल्या संभाषणातील काय झाडी, काय डोंगार, काय हाटील... हे वाक्य तुफान गाजलं. अनेकांनी या डायलॉगवरुन मिम्स आणि गाणीही वाजवली. आता, तब्बल १५ दिवसांनी शहाजी बापू पाटील त्यांच्या सांगोला मतदारसंघात परतले आहेत. त्यावेळी मोठ्या जल्लोषात गावकऱ्यांनी त्यांचं स्वागत केलं. हलगीच्या तालावर, फटक्यांची आतिषबाजी झाली. राज्याच्या विधानसभेत सोमवारी बहुमत चाचणी घेण्यात आली आणि यात १६४ आमदारांच्या

पाठिंब्यानं एकनाथ शिंदे सरकार चाचणीत यशस्वी झालं. त्यामुळे, शिवसेनेतील बंडखोर आमदाराचं हे बंड यशस्वी झालं. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह विरोधी पक्षातील नेत्यांची भाषणं झाली. तर, अजित पवारांनीही तुफान फटकेबाजी केली. यावेळी, त्यांनी आमदार शहाजी बापू पाटील यांच्या व्हायरल डायलॉगवरही भाष्य केलं होतं. त्यामुळे, शहाजी बापू पाटील चांगलेच चर्चेत आले आहेत. सोशल मीडियावरही त्यांचे फॅन फॉलोविंग वाढले आहे. आता, आपल्या गावी आल्यावर त्यांच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या जल्लोषात त्यांचं स्वागत केलं. आमदार शहाजी बापू पाटील यांना कार्यकर्त्यांनी गराडा घातला होता. त्यावेळी, कार्यकर्त्यांनी त्यांना खांद्यावर उचलून घेतलं होतं. फटाक्यांची आतिषबाजी आणि हलगीच्या तालावर कार्यकर्ते सांगोल्यात नाचताना दिसून आले. शिवसेनेत बंड केल्यावर एकनाथ शिंदे जेवढे प्रकाशझोतात आले, त्यापेक्षा अधिक शहाजीबापू आले ते त्यांच्या अस्सल सोलापुरी ग्रामीण ढंगातील संवादामुळे. बंडानंतर शिंदे यांच्या गटात गेलेल्या काही मंत्री, आमदारांसह शहाजीबापू सध्या गुवाहाटीतील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये असताना त्यांनी कार्यकर्त्याशी साधलेल्या संवादानंतर 'बापू' राज्यात चांगलेच ट्रेंडमध्ये आले आहेत. बापूंच्या या संवादातून रचलेल्या गाण्यानं सोशल मीडियाच्या माध्यमातून दुष्काळग्रस्त सांगोल्याला देश-विदेशात पोहोचवलं आहे.

ठाणे जिल्ह्याला अतिवृष्टीचा इशारा

साप्ता. अधिकारनामा

ठाणे : भारतीय हवामान विभागाकडून ठाणे जिल्ह्याला ९ जुलै पर्यंत अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे. यामुळे जिल्हा प्रशासनाकडून आपत्ती व्यवस्थापन विभागाला सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. ठाणे जिल्ह्यात मागील तीन ते चार दिवसांपासून पावसाची संततधार सुरु आहे. यामुळे ठाणे शहरासह कल्याण- डोंबिवली मधील सखल भागांमध्ये पाणी साचत आहे. तसेच मागील काही दिवसांपासून ठाणे शहरात विविध ठिकाणी वृक्ष उन्मळवून



पडल्याच्या तसेच काही ठिकाणी भिंती कोसळण्याच्या घटना समोर आल्या आहेत. सुदैवाने यात कोणत्याही जीवितहानी झाल्या नाहीत. मागील पाच दिवसाच्या कालावधीत ठाणे जिल्ह्यात सरासरीच्या ६४.८ टक्के पावसाची नोंद करण्यात आली आहे. मंगळवारी देखील ठाणे जिल्ह्यात पावसाने जोरदार हजेरी लावली. मागील तीन ते चार दिवसांपासून ठाणे जिल्ह्यात पावसाने दमदार हजेरी लावलेली असताना ९ जुलै पर्यंत जिल्ह्याला अतिवृष्टीचा इशारा (ऑरेंज अलर्ट) देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाकडून आपत्ती व्यवस्थापन विभागाला सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच ठाणे जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर यांनी स्थानिक यंत्रणांना भुस्खलन होऊ शकणाऱ्या गावांची आणि क्षेत्रांची पाहणी करून आपत्ती व्यवस्थापनाचा आराखडा तयार करून तेथील स्थानिक जनतेला त्याबाबत माहिती देण्याच्या सूचना दिल्या आहेत.

शेतकऱ्यांना चारा उपचाराचे प्रात्यक्षिक धडे

किरण कुमार निमकंडे

अकोला : डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला संलग्नित कृषी महाविद्यालय रिसोड येथील अंतिम वर्षातील कृषीदुतांनी ग्रामीण जागरूकता कार्यानुभव कार्यक्रम व कृषी ओद्योगिक जोड २०२२ - २३ या अनुशंगाणे रिसोड येथील शेतकऱ्यांना युरिया ,गूळ व मिठ यांचा एकत्रीत वापर करून चारा उपचार कसा करावा व त्याचे फायदे काय आहेत याबद्दल सविस्तर माहिती शेतकऱ्यांना देऊन प्रात्यक्षिक करून दाखविले.यावेळी साधरणतः एक लिटर पाण्यात ५०० ग्रॅम गूळ ५० ग्रॅम मीठ व

१० ग्रॅम युरिया एकजीव करून १ किलो वाळलेल्या चाऱ्यावर शिंपडून मिश्रण केले. हा चारा गुरांना दिल्यामुळे त्यांची पचनशक्ती वाढून त्यांना पोषक द्रव्ये मिळतात.अशी माहिती शेतकऱ्यांना प्रात्यक्षिका द्वारे दर्शविली. या वेळी कृषी महाविद्यालय रिसोड येथील कृषीदुत सुजित रमेश इंगळे, प्रवीण प्रदीप इंगळे , पंकज अशोक सोळंके, अनिकेत पुरी, ओंकार इंगळे व शेतकरी भारत काळे, राधेश्याम गंगावणे, राजेश काळे, सचिन शिरसागर , जगदिश लोखंडे, अशोक काष्टे , जगदिश काळेतसेच इतर शेतकरी वर्ग उपस्थित होते आणि तसेच या कार्यक्रमासाठी कृषी महाविद्यालय रिसोड चे प्राचार्य डॉ.आशिष अप्तुरकर, मा.आर.एस.डवरे विशेष तांत्रीक समन्वयक कृषि महाविद्यालय रिसोड , प्रा.डी. डी. मसुडकर RAWE कार्यक्रम समन्वयक, प्रा.आर. वाय.सरनाईक कार्यक्रम अधिकारी, तसेच विषय विशेषतज्ञ प्रा. कृष्णा देशमुख व प्राध्यापिका पुजा वळसे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

गंधर्व नाटक मंडळीच्या सुवर्णस्मृतींना उजाळा

साप्ता. अधिकारनामा

पुणे : संगीत रंगभूमीच्या सुवर्णस्मृतींना 'सावतामाळी भवन'मध्ये मंगळवारी नव्याने उजाळा देण्यात आला. संगीत रंगभूमीचा सुवर्णकाळ अजरामर करणारे नटसम्राट बालगंधर्व, संगीतकार गोविंदराव टेंबे आणि नटश्रेष्ठ गणपतराव बोडस यांच्या उपस्थितीत स्थापन झालेल्या 'गंधर्व नाटक मंडळी'चा शतकोत्तर दशकपूर्ती समारंभ त्यांच्या वंशजांच्याप्रति कृतज्ञता व्यक्त करून साजरा झाला. गंधर्व नाटक मंडळी'च्या ११० व्या स्थापनादिनानिमित्त बालगंधर्व संगीत रसिक मंडळाच्या वतीने बालगंधर्व यांच्या नातसून अनुराधा राजहंस, गोविंदराव टेंबे यांचे नातू दीपक टेंबे आणि गणपतराव बोडस यांचे पणतू व प्रसिद्ध ऑर्गनवादक राहुल गोळे यांचा मंडळाचे अध्यक्ष सुरेश साखवळकर यांच्या

हस्ते सत्कार करण्यात आला. नाट्यसंगीत गायक रवींद्र कुलकर्णी, मंडळाचे कोषाध्यक्ष नारायण भालेराव, सचिव अवंती बायस, विवेक काटकर आणि संतोष रासकर या वेळी उपस्थित होते. बालगंधर्व यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच त्यांच्या गाजलेल्या नाटकांमधील संवादांचे सादरीकरण झाले.

साखवळकर म्हणाले, मतभेदांमुळे किलीस्कर नाटक मंडळीमधून बाहेर पडून बालगंधर्व, गोविंदराव टेंबे आणि गणपतराव बोडस यांनी ५ जुलै १९१३ रोजी गुरुपुष्यामृताच्या मुहूर्तावर बुधवार पेठेतील माळयांची धर्मशाळा म्हणजेच सध्याचे सावतामाळी भवन येथे 'गंधर्व नाटक मंडळी'ची स्थापना केली. या नाटक कंपनीला काकासाहेब खाडिलकर यांनी 'गंधर्व नाटक मंडळी' हे नाव दिले. साहित्यसम्राट न. चिं. केळकर, सॉलिसिटर पी. एम. लाड, पेण येथील बाबासाहेब धारकर, मुंबई येथील डी. एल. वैद्य असे दिग्गज या वेळी उपस्थित होते. संगीत रंगभूमीवरील या ऐतिहासिक घटनेला उजाळा देण्यात आला ही आनंदाची बाब आहे.

खा.बाळू धानोरकरांचे भद्रावतीत जल्लोषात स्वागत

महेश निमसटकर

भद्रावती : भद्रावतिचे भुमिपूत्र असलेल्या चंद्रपूर-वणी-आर्णी लोकसभा मतदार संघाचे खासदार बाळू धानोरकर यांच्या वाढदिवसानिमित्त दि.४रोज सोमवारला आयोजीत करण्यात आलेल्या भद्रावती विशेष दौऱ्यात भद्रावती तालुका व शहरातील नागरिक तथा तथा मित्र मंडळातर्फे खासदार धानोरकर यांचे जल्लोषात स्वागत करुन त्यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. याप्रसंगी स्थानिक सेलिब्रेशन सभागृहात आयोजित कार्यक्रमात नगराध्यक्ष अनील धानोरकर, कांग्रेस पक्षाचे जिल्ह्यातील

वरिष्ठ नेते भद्रावती पालिकेचे पदाधिकारी, व्यावसायिक तथा इतर मान्यवर उपस्थित होते. यावेळी केक कापुन खासदार बाळू धानोरकर यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. अनेक मान्यवरांनी यावेळी पुष्पगुच्छ तथा भेटवस्तू देऊन खासदार बाळू धानोरकर यांचे स्वागत करीत त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी बाळू धानोरकर यांनीही कृतज्ञता व्यक्त करीत नागरिकांचे आभार मानले व आपण क्षेत्राच्या विकासासाठी सदैव कटिबद्ध असल्याची ग्वाही दिला.या कार्यक्रमाला तालुक्यातील व शहरातील नागरिक, कांग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संकेत उपस्थित होते.

संपादकीय

पाडले कोणास? पडले कोण?

मुख्यमंत्रीपदी शिंदे यांच्या निवडीऐवजी 'सरकारात मी नसेन' म्हणणाऱ्या फडणवीस यांना उपमुख्यमंत्रीपद स्वीकारावे लागणे याची चर्चा अधिक मोठी ठरली.. उद्धव ठाकरे यांचे महाविकास आघाडी सरकार पाडल्यानंतर गुरुवारी दिवसभर ज्या काही घडामोडी घडल्या त्या पाहिल्यास कोणाही विचारी जनाच्या मनास पडणारा प्रश्न असेल : पाडले कोणास आणि पडले कोण? या प्रश्नाचे उत्तर शोधताना जे काही घडले त्याचा आढावा घेणे आवश्यक. यातील पहिली घटना म्हणजे शिवसेना फुटीर आणि भाजप यांनी मुख्यमंत्रीपदी एकनाथ शिंदे यांची घोषणा करणे. हाच अनेकांस धक्का होता. या निमित्ताने सतत धक्का देत राहण्याची आपली परंपरा भारतीय जनता पक्षाने कायम राखली आणि उद्धव ठाकरे गच्छन्तीनंतर त्यांच्या एकेकाळच्या उजव्या हातास म्हणजे एकनाथ शिंदे यांस मुख्यमंत्रीपदी बसवले. या संदर्भात एक कबुली द्यायला हवी. तीन दिवसांपूर्वी असे काही होणार असल्याचा सुगावा 'लोकसत्ता'च्या ठाणे प्रतिनिधीस लागला होता आणि तशी बातमीही दिली जाणार होती. परंतु माध्यमांत जर-तरला स्थान नसते. त्यामुळे ते वृत्त प्राधान्याने द्यायला हवे होते असे आता म्हणण्यात अर्थ नाही. अन्यांस मात्र शिंदे यांची निवड हा पूर्ण धक्का असेल. भाजपचा सध्याचा इतिहास पाहता खरे तर या धक्का देण्याच्या तंत्राचाही धक्का बसेनासा झाला आहे. असो. मुख्यमंत्रीपदासाठी शिंदे यांची निवड जाहीर झाल्यानंतर भाजपने असे का केले हा प्रश्न. शिंदे यांच्या हाती मुख्यमंत्रीपद देणे या कृतीचे वर्णन सोप्या मराठीत 'काटयाने काटा काढणे' असेच होऊ शकते. भाजपसाठी सध्या सर्वात मोठा प्रतिस्पर्धी आहे तो शिवसेना आणि त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस. यांपैकी शिवसेनेस 'थंड' करण्याचे काम शिंदे अधिक सुलभपणे करू शकतील. परत शिंदे यांची संभावना आता गद्दार वगैरे विशेषणांनी करणेही अवघड. अशा टीकेचा अतिरेक झाल्यास 'सामान्य सैनिक मुख्यमंत्रीपदी बसलेला ठाकरे यांस पाहवत नाही' असे म्हणण्याची सोय शिंदे यांस अधिक. यातील दुसरा मुद्दा सामान्य शिवसैनिकास जास्त आकर्षक वाटू शकतो. तेव्हा शिंदे यांना मुख्यमंत्रीपदी बसवल्याने शिवसैनिकांच्या विरोधाची धार आपोआप बोथट होऊ शकते. असे करण्यातील भाजपचा स्वार्थ म्हणजे त्यामुळे शिवसेनेच्या टीकेचा रोख हा यापुढे भाजप नेतृत्वावर न राहता तो शिंदे यांच्यावर असेल आणि शिंदे यांच्यावरील टीका उलटण्याची शक्यता लक्षात घेता त्या टीकेसही नैसर्गिक मर्यादा राहतील. तसेच अद्याप शिवसेना नक्की कोणती आणि कोणाची हे प्रश्नही निकालात निघालेले नाहीत. आपलीच सेना खरी असे शिंदे आणि त्यांचे फुटीर म्हणत आहेतच. आता खुद्द शिंदेच मुख्यमंत्री झाल्याने हे नाकारणे आणि सेनेवरील प्रभुत्व/नियंत्रण राखणे ठाकरे यांस अधिक जड जाईल, असा विचार भाजपने केला असण्याची शक्यता आहे. त्याच वेळी जे ठाकरे यांच्या शिवसेनेत अद्याप आहेत त्यांनाही शिंदे यांच्याकडे जाण्याचा अधिकाधिक मोह होत राहील. म्हणजे भाजप जे करू पाहतो ते काहीही स्वतः न करता भाजपसाठी साध्य होईल. याखेरीज अत्यंत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे प्रशासकीय, धोरणात्मक आदी अनुभवासाठी शिंदे यांस पूर्णपणे भाजपवर अवलंबून राहावे लागेल. शिंदे यांच्या समर्थक आमदारांची संख्या भले चांगली असेल. पण गुणात्मकतेच्या आघाडीवर त्यांच्याकडे खडखडाटच दिसतो. तेव्हा शिंदे यांस स्वतः अधिकाधिक फडणवीस यांच्याकडे पाहावे लागेल. येथपर्यंत ठीक.

हे जाहीर करताना 'ठाकरे सरकार पाडा' मोहिमेचे गेल्या कैक महिन्यांतील सूत्रधार देवेंद्र फडणवीस यांनी स्वतःकडे त्यागाची भूमिका घेतली आणि सरकारात सामील न होण्याचा निर्णय घेतला. नव-भाजपच्या गणंगांपैकी एक राम कदम आदींनी फडणवीस यांस त्यागमूर्ती ठरवून त्यांची समाजमाध्यमी आरतीही सुरू केली. येथपर्यंत ठीक. शिंदे हे(च) मुख्यमंत्री होणार असतील तर सरकारात सामील न होण्याचा फडणवीस यांचा निणय अत्यंत स्तुत्य होता. तथापि त्यानंतर अवघ्या काही काळात भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्डा यांनी सत्ताधाऱ्यांच्या गृहवाहिनीसमोर फडणवीस यांनी नव्या सरकारात शिंदे यांच्या हाताखाली उपमुख्यमंत्रीपद स्वीकारावे असा 'निणय' पक्षाच्या सर्वोच्च नेत्यांनी घेतल्याचे जाहीर केले. महाराष्ट्राचे सरकार पडणे, उद्धव ठाकरे यांनी राजीनामा देणे, त्यानंतर एकनाथ शिंदे यांची मुख्यमंत्रीपदी निवड केली जाणे या सर्व धक्क्यांपेक्षा अधिक शक्तिशाली आणि विध्वंसक धक्का होता तो फडणवीस यांनी 'उपमुख्यमंत्रीपद स्वीकारावे' या आदेशाचा. हा प्रकार भयंकर म्हणावा असा. फडणवीस यांनी जाहीरपणे आपण सरकारात सामील होणार नाही असे सांगितल्यावरही पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जाहीरपणे फडणवीस यांना सरकारात सामील होण्याचे, त्यातही तुलनेने कनिष्ठ अशा नेत्याच्या हाताखाली उपमुख्यमंत्री हे पद स्वीकारण्याचे 'निर्देश' देतात हे धक्कादायक आहे. इतकेच नाही तर गृहमंत्री अमित शहा हेदेखील पाठोपाठ फडणवीस उपमुख्यमंत्रीपदी 'नेमले' जात असल्याचे ट्वीटद्वारे सूचित करतात, हे काय दर्शवते? फडणवीस यांनी सत्तेबाहेर राहू नये, सत्तेत सहभागी व्हावे अशी पक्षश्रेष्ठींची इच्छा होती तर तिच्या पूर्तीचा सभ्य मार्ग होता. गुरुवारी नाहीतरी फक्त शिंदे हेच मुख्यमंत्रीपदाची शपथ घेणार होते. म्हणजे लवकरच मंत्रिमंडळ विस्तार करणे आले. या विस्तारात फडणवीस यांच्या हाती उपमुख्यमंत्रीपदाची धुरा देता आली असती. तसेही करावयाचे नव्हते तर मुख्यमंत्री शिंदे हे फडणवीस यांना सत्तासहभागाचा जाहीर आग्रह करतील, गळ घालतील अशी व्यवस्था करावयाची आणि मग या खास लोकाग्रहास्तव फडणवीस यांना मुख्यमंत्रीपदी बसवायचे. हे दोनही आदरणीय मार्ग सोडून भाजप श्रेष्ठींनी फडणवीस यांना 'तुमच्या इच्छेपेक्षा आमचे आदेश महत्त्वाचे' असा जाहीर संदेश देण्याचे कारण नव्हते. आपल्याच पक्षाच्या नेत्याचा असा उघड उपमर्द काँग्रेसनेही कधी केला नसेल असे यावर म्हणावे लागते. उद्धव ठाकरे यांचे सरकार पडावे वा पाडावे यासाठी जिवाचे रान केले देवेंद्र फडणवीस यांनी, एकहाती पक्ष हाकला देवेंद्र फडणवीस यांनी, एकनाथ शिंदे यांस आणि त्यांच्या समर्थकांस आंजारले-गोंजारले फडणवीस यांनी आणि तरीही त्यांना दिली गेलेली वागणूक ही अशी. त्यांच्या हाती मुख्यमंत्रीपद दिल्यास त्यांचे प्रतिमासंवर्धन होऊन नरेंद्र मोदी यांच्यानंतर कोण याच्या उत्तरात त्यांचा सहभाग निश्चित होता. इतकी क्षमता आणि कर्तृत्व फडणवीस यांच्या खाती निश्चितच आहे. त्याचा आदर राखणे दूरच. उलट त्यांना अशी वागणूक दिली जाणे भाजपस न शोभणारे आहे. भाजप ज्येष्ठांचे हे असे वर्तन अंतिमतः राजकीयदृष्टयाही महागात पडू शकते. याचे कारण असे की पूर्ण मराठी मातीतच मुळे असलेली शिवसेना वा राष्ट्रवादी काँग्रेस या मुद्दयास 'महाराष्ट्राचा घोर अपमान' ठरवून त्यावर रान उठवू शकतात. तसे झालेच तर खुद्द भाजपच्याच अनेक नेत्यांची- यात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचेही अनेक आले- यास सहानुभूतीच असेल. राष्ट्रीय स्तरावर मोदी यांची जशी एक प्रतिमा आहे तशी राज्य स्तरावर फडणवीस यांची आहे. राज्यातील वरिष्ठ मध्यमवर्गीयांचा एक मोठा गट फडणवीस यांचा चाहता आहे. या सगळयाची कसलीही कदर न करता त्यांना जी वागणूक दिली गेली त्यामुळे हा वर्ग भाजपवर नाराज झाल्यास आश्चर्य नाही. दुसरे असे की फडणवीस यांस उपमुख्यमंत्रीपदावर बसवणे भाजपस चालणारे होते तर मग उद्धव ठाकरे यांचा मूळ अडीच-अडीच वर्षे मुख्यमंत्रीपदाचा प्रस्ताव काय वाईट होता? तो स्वीकारला असता तर फडणवीस असेही याच काळात उपमुख्यमंत्री झालेच असते. पण त्यात त्यांचा आदर राखला गेला असता. ते बहुधा दिल्लीश्वरांस नकोसे असावे. या प्रकारामुळे आज दिवसभराच्या अखेरीस वृत्तमूल्यातही फडणवीस आघाडीवर होते. मुख्यमंत्रीपदी शिंदे यांच्या निवडीऐवजी उपमुख्यमंत्री फडणवीस यांना घ्यायला लावणे ही अधिक मोठी 'बातमी' ठरली. त्यामुळे अंतिमतः एकनाथ शिंदे यांच्या बंडाने पाडले कोणास आणि पडले कोण हा प्रश्न पडतो.

काळाच्या ओघातील 'नैसर्गिक निवड'

एकोणिसाव्या शतकातल्या अनेक वैज्ञानिकांना एक सत्य मनोमन उमगले होते. पूर्वीची जीवसृष्टी आणि त्यातल्या जीवांची ठेवण आजपेक्षा बरीच वेगळी होती. बहुधा त्यात अधिक वैविध्यही होते. आज जी जीवसृष्टी आपण भोवताली पाहातो ती तिच्या इतिहासातला एका अर्थाने त्रोटक नमुना आहे. 'वाहिले ते पाणी राहिले ते गंगाजळ' असे तिचे वर्णन योग्य ठरेल! पण जीवसृष्टीतले वाहून गेलेले प्रपात कशामुळे नाहीसे झाले! आणि जे राहिले त्यांच्यात असे काय होते की त्यांना तगून राहता आले? या वाहून गेलेल्या वैविध्याचा निचरा कशाने झाला आणि आजघडीला जिवंत राहिलेल्या वैविध्याचे त्याच्याशी काय नाते होते, या कोडयाचा उलगडा करणारे एक उत्तर डार्विनने सूत्रबद्ध केले आहे, त्याचे नाव 'नैसर्गिक निवड'! ही मोठी प्रभावी पण तरल कल्पना आहे. तिच्या नावाची ठेवण जरा निसरडी आहे. जीवांचे गुणावगुण, त्यांच्या क्षमता मुख्यतः त्यांच्या जनुकांनी घडतात. जीवांना ज्या परिसरात जगायचे असते तो परिसर, ते पर्यावरण काही बाबतीत पोषक असते तर काही बाबतीत घातक. जीवांना आपल्या मर्जीने ना जनुके निवडता येतात ना भोवताल. त्यांची अन्य जीवांशी कधी मैत्री असते, तर कधी स्पर्धात्मक वैमनस्य असते. अशी जगण्याची कसरत करताना ते काही खटपट करून पर्यावरणाशी अनुकूलन साधण्याची क्षमता कमावतात. या क्षमतांमागे जनुकबदल असतात आणि जनुकाची जोड असेल तर त्यांच्या वंशजाकडे पण हे अनुकूलन येते. त्यांची प्रजा आणि वंशवेल फोफावत जाते. ज्यांना असे अनुकूलन लाभत नाही, ते तगू शकत नाहीत. त्यांच्या न तगण्याचे परिणाम त्यांच्या वंशवेलीतही दिसतात. कालांतराने त्या जीवांची शाखा अस्तंगत पावल्यागत ढासळते. त्यांच्या वंशजांची संख्या रोडावत जाते. उदाहरणार्थ- फार प्राचीन काळी मॅमॉथ नावाचे हत्तीचे प्राचीन पूर्वज होते. त्यांच्या अंगावर फार केस नसायचे. पण त्यातल्या एका वंशफांदीमध्ये जनुकी बदल झाले आणि केसांचे प्रमाण वाढले. अतिथंड प्रदेशात जगण्या-तगण्यासाठी हे केसाळ आवरण कामी आले. अतिथंड प्रदेशात इतर मॅमॉथ टिकू शकले नाहीत. म्हणून ते अस्तंगत झाले. पण त्यांचे सुकेश भाऊबंध तगून राहिले. अशा सुकेश मॅमॉथचे संपूर्ण सांगाडे गोठलेल्या हिमात आढळले आहेत. सुकेश होणे हा परिस्थितीशी अनुकूलन घडविणारा, तगण्याची हमी देणारा घटक ठरला. ज्यांना हे सुकेशी कवच लाभले नाही त्यांचा त्या परिसरातून अस्त झाला.

आणखी एक उदाहरण पाहू. समुद्राकाठच्या भागात विशेष प्रकारची कासवे अंडी घालतात. ही अंडी त्यांनी वाळूत पुरून ठेवलेली असतात. त्यांचे थोटे कल्लेवजा पाय हे वाळू उपसण्यासाठीचे हत्यार असते. मात्र त्यांच्या पायांची ठेवण अशी असते की, पायांनी वाळू उपसणे कष्टप्रद ठरते आणि त्याची गतीही कमी राहते. ही वाळूची उपसाउपशी संपेपर्यंत वरचे घिरटयाघालणारे पक्षी काही अंडी फस्त करतात. त्यामुळे कासवांच्या पिल्लांची संख्या कमी होते. पुढच्या पिढीचा विस्तार खालावतो. कल्पना करा, की या कासवांच्या कल्लेवजा पायांत जनुकीय विकारभेद झाला आणि त्यांचा वाळू उपसा अधिक खोल आणि जलद झाला तर तगणाऱ्या कासवांची संख्या वाढेल. मूळ जनुकीय ठेवण, परिसर आणि पर्यावरणाच्या ठेवणीतली पोषक आणि घातक क्षमता, अपघातांमुळे घडणारे जनुकीय विकारबदल या तिन्हींच्या घुसळणीतून जे जगतात, तगतात ते जणू निसर्गाकडून निवडले गेलेले 'विजयीवीर' ठरतात. 'नैसर्गिक निवड' या शब्दाचा हा विशिष्ट अर्थ आहे. इंग्रजीतील 'नॅचरल सिलेक्शन' हा शब्दप्रयोगदेखील जरा अवघडलेला आणि आडवळणाचा आहे. सिलेक्शन म्हटले की मनाशी काही उद्देश धरून कोणी तरी निवडलेला, असा अर्थभास त्यात असतो. पण ज्या अर्थाने डार्विनने हा शब्द वापरला त्यात असा कोणी निवडकर्ता नाही. त्याचा काही उद्देशदेखील नाही. निवडला किंवा वेचला जाणे ही निखळ अनेक घटकांनी साकारलेली प्रक्रिया आहे. हा शब्द वापरात आला तो कृत्रिम निवडीच्या विरुद्ध अर्थाने! कृत्रिम निवडीच्या मानवी क्षमता आणि उठाठेवींनी आपले जीवनमान गजबजलेले आहे. पाळीव प्राणी किंवा वनस्पती हेरणे, त्यांच्यामध्ये प्रयत्नपूर्वक ठरावीक गुणांची प्रजा पैदा व्हावी यासाठी खटाटोप करणे हा मानवी संस्कृतीचा कणा आहे. हजारो प्रकारच्या गवतांमधून मानवाने आपल्याला अनुकूल अशी तांदूळ, ज्वारी, गहू, असे शेलके गवत निवडले. त्याचे बी गोळा करून ते पुनःपुन्हा अधिकाधिक संख्येने पेरले. त्याच्याबरोबर स्पर्धा करणारे सभोवतालचे सर्व प्रकारचे गवत उपटून टाकले! ज्याचे दाणे पाहिजेत त्या गवताला धन म्हटले. उरलेल्या स्पर्धक गवतांना तण म्हटले. आज त्या स्पर्धा करणाऱ्या गवताची लोकसंख्या रोडावली. कारण आपण त्यांचा समूळ नायनाट करतो! असे कृत्रिम म्हणजे मानवी हस्तक्षेपाने साकारलेले गवतविश्व हे कृत्रिम निवडीने घडविले आहे. हा कृत्रिम निवडीचा खटाटोप म्हणजेच शेती. तांदूळ, ज्वारी, गहू, देणारे गवत हापूस, पायरी यांसारख्या आंब्याच्या जाती, विविध जातींचे इष्ट गुणांसाठी पैदासलेले संकरित कुत्रे, गाई, म्हशी, घोडे असे किती तरी कृत्रिम निवडीचे मासले आहेत. या अर्थाने कृत्रिम निवड हा शब्दप्रयोग प्रचलित होता. त्याच्या उलट अर्थाने नैसर्गिक निवड हा शब्द घ्यायचा आहे. या निवडीला कर्ता नाही. निवडीमागे कर्त्यांच्या हेतूचा मागमूसही नाही. जनुकबळ, जनुकबदल, पर्यावरणाचा प्रभाव, पुनरुत्पादनात येणारे भलेबुरे प्रसंग, त्यातील यशापयश, अशा अनेक दबावांनी घडलेल्या प्रक्रियेचे फलित ती 'नैसर्गिक निवड'!



'महाशक्ती'च्या राजकारणाचा उदय

जो अतर्क्य अपवाद वाटेल, तोच निर्णय घेणे यातूनही ताकद दाखवण्याचा प्रकार दिसतो. अन्य साऱ्याच क्षेत्रांवर राजकीय शक्तीचा वरचष्मा ठेवण्याचा आग्रह या वर्चस्ववादी राजकारणात इतरांनाही खेचतो आणि अरेरावी सुरूच राहाते.. उन्हाळा म्हटला की उन्हाच्या तीव्र झळा लागणारच. त्यात यंदाच्या उन्हाळयात राजकीय वातावरणदेखील चांगलेच तापले आणि त्यातून घटनेतील अनेक गोष्टींची पायमल्ली केली गेली. उडुपी ते उदयपूर व्हाया खरगाव, प्रयागराज, दिल्ली आणि गुलबर्ग सोसायटी असा प्रवास करताना आपल्या समाजाने शिक्षणसंस्थांमध्ये हिजाबवर बंदी घालण्यापासून ते लाऊडस्पीकरवर अजान रोखण्यापर्यंत, गुंडगिरीपासून ते बुलडोझर चालवून एखाद्याचे राहाते घर जमीनदोस्त करेपर्यंत, ईश्वरिनदेपासून शिरच्छेदापर्यंत अशी बरीच मजल मारली आहे. आपण एका नवीन राजकीय व्यवस्थेला सामोरे जात आहोत. भारताच्या उदारमतवादी लोकशाहीचे विकृतीकरण असे तिचे वर्णन करणे निरर्थक आहे. ती तिच्याच भाषेत समजून घेतली पाहिजे. इंदिरा गांधींच्या काँग्रेसने लादलेली आणीबाणी भाजप सरकारला शालेय पाठयपुस्तकांमधून काढून का टाकायची आहे? निवडणुकीतील शानदार विजयानंतरही योगी आदित्यनाथ सरकारने जावेद मोहम्मद यांच्या घरावर इतका गाजावाजा करत बुलडोझर का फिरवला? ईशिनदेबद्दल अलीकडेच आंतरराष्ट्रीय पातळीवर कशी नाचक्की झाली, त्यातून राजनैतिक पेच कसा निर्माण झाला, याची पूर्ण जाणीव असतानाही सरकार तिस्ता सेटलवाड आणि मोहम्मद झुबेर यांच्यावर कारवाई करायला का गेले? या प्रश्नांची उत्तरे राजकीय नफा-तोटयाच्या साध्या गणिताने देता येणार नाहीत. किंवा हुकूमशाही सरकारने आंधळेपणाने केलेली निडर कृत्ये असेही त्यांना म्हणता येणार नाही.

वरवर हे सगळे वेडेपणाचे वाटत असले तरी त्यातदेखील एक संगती आहे. आपण एका वर्चस्ववादी राजकारणाचा उदय होताना पाहात आहोत. त्यात सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक किंवा आर्थिक अशा सर्व क्षेत्रांवर राजकीय सत्तेची 'महाशक्ती' असेल. निवडणुकीच्या, प्रशासकीय, वैचारिक तसेच रस्त्यावरच्या अशा सत्तेच्या सर्व प्रकारांवर राजकीय क्षेत्राला संपूर्ण नियंत्रण मिळवायचे आहे. श्वास घ्यायला जरादेखील उसंत न देता ही अत्यंत महत्त्वाकांक्षी प्रक्रिया अथक सुरू राहील. तिला थांबणे माहीतच नसेल. २०२२ चा उन्हाळा हा अशा पद्धतीने या 'महाशक्ती'च्या राजकारणाचा काळ होता. हे शीतयुद्धाच्या काळात होते तसे वर्चस्ववादी राजकारण नाही किंवा हुकूमशाही/ कट्टरतावादाचे नवे रूप एवढेच त्याला म्हणता येणार नाही. हुकूमशाही राज्यपद्धतीत चालणाऱ्या निरंकुश राजकारणाला आपल्याला लोकांचा भरघोस पाठिंबा आहे, हे सतत दाखवायचे असते, तसेही इथे नाही. त्यामुळे लोकांना कशावर तरी भाळून त्यात सतत गुंतवून ठेवण्याची गरज असते. युरोपीय 'फॅसिझम'प्रमाणे हे व्यक्तिवादाचे फलित नसून, उलट उद्दाम- उन्मादी सामुदायिक जीवनाचे फळ आहे. हा निव्वळ कट्टरतावादही नव्हे, कारण त्यात आधुनिक राजकारणाला नसून धर्माला प्राधान्य असते. तिस्ता सेटलवाड यांच्या अटकेमुळे या नव्या वर्चस्ववादी, निरंकुश व्यवस्थेचे दोन घटक समोर आले आहेत. गुजरातमधील गुलबर्ग सोसायटी प्रकरणातील 'क्लीन चिट'मध्ये नवीन काहीच नाही; आपली न्यायव्यवस्था सामान्यतः दंगली वा वंशविच्छेदासारख्या कृत्यांच्या वेळी राजकीय नेते जे करतात त्याकडे किंवा जो निष्क्रियपणा दाखवतात त्याकडे डोळेझाक करताना जनमताचा आधार घेते, असे दिसून आले आहे. मात्र या प्रकरणामुळे मानवतेविरुद्धच्या गुन्ह्यांसाठी शिक्षा होण्याचा मार्ग खुला झाला असता. आजवर न्यायव्यवस्था अशा प्रकरणांची मूक साक्षीदार होती; या वेळी मात्र न्यायालयाचा निणयही, सूडनाटय सुरू करण्यासाठी वापरला गेला. 'महाशक्ती'साठी चाललेल्या अखंड प्रयत्नांचा एक वानवळा म्हणजे झुबेरला झालेली अटक. ही अटक केवळ बदला घेण्यासाठी नाही. यातूनच त्याच्या अटकेमागच्या निमित्ताचा ढिसाळपणा स्पष्ट होतो.

'एमपीएससी'ने आता निकालही वेळेत द्यावा

'राज्यसेवेच्या परीक्षा पद्धतीत बदल' ही बातमी (२५ जून) वाचली. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) राज्यसेवा मुख्य परीक्षेत केलेल्या या बदलामुळे येत्या काळात यूपीएससी परीक्षेत महाराष्ट्रातील परीक्षार्थीना फायदा तर होईलच शिवाय राज्याच्या प्रशासनातही व्यापक दृष्टिकोन असलेल्या अधिकाऱ्यांचा समावेश होईल. यापूर्वीची मुख्य परीक्षा ही वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाची असल्यामुळे परीक्षार्थीना एका नियमित प्रकारातच अभ्यास करावा लागे. मात्र आता परीक्षा दीघरेत्तरी, त्यातही पेपर २ मध्ये आंतरराष्ट्रीय घडामोडी आणि पेपर ४ मधील नैतिकता, चारित्र्य आणि योग्यता या विषयाच्या समावेशामुळे चौकस आणि व्यापक दृष्टिकोन ठेवून अभ्यास करावा लागणार आहे. बदललेली परीक्षा पद्धत ही यूपीएससीच्या मुख्य परीक्षेप्रमाणेच झाली असल्यामुळे आता महाराष्ट्रातील 'यूपीएससी' उत्तीर्णतेचे प्रमाण वाढण्यासही काहीशी मदत होईल. मात्र ज्याप्रमाणे यूपीएससीने यंदा पूर्वपरीक्षेचा निकाल केवळ १७ दिवसांत लावला त्याचप्रमाणे एमपीएससीनेही किमान दिवसांची मर्यादा पाळायला हवी. एमपीएससीतर्फे अधिक पारदर्शकतेसाठी पहिली आणि दुसरी उत्तरातालिका जाहीर केली जाते, मात्र ही प्रक्रिया ठरावीक वेळेत व्हायला हवी. तसेच मुख्य परीक्षा लेखी स्वरूपात असल्यामुळे त्यांचे होणारे मूल्यांकनही यूपीएससीच्या धर्तीवर व्हायला हवे. केवळ यूपीएससीप्रमाणे परीक्षा पद्धत करून निकालाच्या प्रक्रियेला जर काही तांत्रिक तसेच इतर कारणांमुळे विलंब होत असेल तर नवीन बदलाचा जास्त सकारात्मक परिणाम होणार नाही, याबाबत आयोगाने योग्य ती नवीन व्यवस्था आणि काळजी घ्यायला हवी आणि यासाठी लागणारे आवश्यक मनुष्यबळ सरकारने उपलब्ध करून द्यायला हवे!

'एमपीएससी'ने जुना पॅटर्न बदलून परीक्षा बहुपर्यायात्मक केली तेव्हापासून बहुतेक विद्यार्थ्यांची मागणी होती की परीक्षा 'यूपीएससी'च्या धर्तीवर व्हावी. अखेर जवळपास दशकभराने ती पूर्ण होते आहे, त्यामुळे 'राज्यसेवेचा परीक्षा पद्धतीत बदल' ही बातमी (लोकसत्ता- २५ जून) वाचून जीव भांडयात पडला. नवीन पॅटर्नचे फायदे खूप आहेत. एक तर प्रशासनात आता निर्णय घेऊ शकणारे समस्येचं निराकरण करू शकणारे सक्षम अधिकारी भरती केले जातील, दुसरा म्हणजे संघ लोकसेवा आयोग आणि राज्य लोकसेवा आयोग या परीक्षांची वेगळी तयारी करत बसावे लागणार नाही. पाठांतरावर पास होणारे रट्टापोपट आता बाहेर पडतील आणि सारासार विचार करून स्वतः निणय घेऊ शकणारे संवेदनशील अधिकारी भरले जातील. पण काही विद्यार्थी या निणयाच्या विरोधात उभे ठाकू शकतात, त्यांच्यावर अन्याय झाला असे त्यांना वाटू शकते, पण परीक्षा पद्धतीत बदल करणे हा आयोगाचा अधिकार आहे, त्यामुळे नव्या बदलांना विद्यार्थ्यांने सामोरे जावे आणि परीक्षा पद्धती जशी बदलली तशी स्वतःच्या तयारीमध्ये बदल करावे हेच योग्य राहील. आदित्य ठाकरेंचा यात काय दोष?' हा माजी पोलीस आयुक्त ज्युलिओ रिबेरो यांचा लेख वाचला. घराणेशाहीमुळे काँग्रेस पक्ष जर्जर झालेला असताना त्यातून काहीही बोध न घेता सर्वोच्च नेतेपद पक्ष संघटनेवर लादणे हे दुहीला वाट करून देते हे नक्की. आज राज्यात जी काही अस्थिरता निर्माण झाली आहे, ते कुठल्या लोकशाही तत्त्वात बसते? 'वर्षी' सोडण्याचा सोहळा करून जनमनात सहानुभूती निर्माण करणारे या सर्व अस्थिरतेला पूर्णविराम का देऊ शकत नाहीत? सतत बंडखोरांवर दबाव आणण्यापेक्षा त्यांच्याशी मनमोकळा संवाद साधायचा प्रयत्न झाला असता तर ख्या अर्थाने बाळासाहेबांचा वारसा चालविला गेला असता.

'आदित्य ठाकरेंचा यात काय दोष?' हा 'रविवार विशेष'मधील (२६ जून) लेख वाचला. या लेखाने राजकारणातील घराणेशाहीची अपरिहार्यता स्वीकारली आहे असे जाणवते. आपल्याकडे अजूनही घराणेशाहीची मानसिकता सर्वत्र आढळते. जनतेच्या प्रश्नांची सखोल जाण ठेवून निणयक्षमता अंगी असणे ही राजकारण या क्षेत्राची गरज आहे. त्याचबरोबर जनतेत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांशी विश्वासाचे नाते निर्माण व्हावे लागते. केवळ आधुनिक विचारसरणी बाळगली म्हणजे नेतृत्व जडणघडणीच्या पायऱ्या टाळता येतात असे होत नाही. असे नेतृत्व स्वीकारणे हे वर्षांनुवर्षे काम केलेल्या कार्यकर्त्यांसाठी नेहमीच अवघड जाते. ही स्थिती जवळपास सर्वच पक्षांमध्ये आढळते. परंतु अशा परिस्थितीतही बंड हा काही एकमेव पर्याय असू शकत नाही. नियमित परस्परसंवादातून ही परिस्थिती टाळता येऊ शकते. आदरणीय यशवंतराव चव्हाण, बाळासाहेब ठाकरे, शरदचंद्र पवार या राजकारणातील दिग्गज व्यक्तिमत्त्वांच्या कार्यशैलीतून ही बाब अधोरेखित होते. तरुणांच्या हाती नेतृत्व सोपवणे ही एक स्वागतार्ह बाब आहे. परंतु त्यांनी विविध आव्हानांवर आपली कार्यक्षमता सिद्ध केली आहे का, हे तपासावे लागेल. ''महाशक्ती'चा मुखवटा' हे 'शनिवारचे संपादकीय' (२५ जून) वाचले. मुखवटा हा आज ना उद्या गळून पडणारच- मग तो महाशक्तीचा असो किंवा सत्तेच्या, पैशांच्या मोहापायी खोटया हिंदूत्वाचा असो. आत्तापर्यंत भारतीय जनता पक्षाचा एकनाथ शिंदे यांच्या बंडाशी संबंध आहे की नाही हा प्रश्न होता. ज्याचे उत्तर खरे तर दिवसाच्या प्रकाशाप्रमाणे अगदी स्पष्ट होते. पण त्याला आणखी स्पष्टता एकनाथ शिंदे यांच्या 'महाशक्ती'बद्दलच्या भाष्यातून आली. परंतु तात्कालिक फायद्याच्या मोहापायी भविष्यात होणाऱ्या मोठ्या नुकसानाची कल्पना कदाचित शिंदे यांनी केली नसावी. शिंदे यांच्या पाठी असणारी 'महाशक्ती' सत्ता स्थापन करण्याकरिता शिंदेंची दिशाभूल करत आहे, त्यांचा वापर करत आहे हे स्पष्ट चित्र डोळयांवर बांधलेल्या आश्वासनांच्या पट्टीमुळे शिंदे यांना दिसत नसावे.

स्वधर्मे निधनं श्रेयः
परधर्मो भयावहः
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

प्लास्टिकबंदी 'यशस्वी' होईल ?

देशभर १ जुलैपासून लागू होणारी एकेरी वापराच्या प्लास्टिकवरील बंदी हे पर्यावरणाच्या दृष्टीने स्वागताह पाऊल आहेच. मात्र, अंमलबजावणीच्या पातळीवर ही बंदी कसे वळण घेते यावरच त्याचे यशापयश अवलंबून राहणार हेही तेवढेच खरे! चार वर्षांपूर्वी महाराष्ट्रातसुद्धा हा बंदीचा प्रयोग झाला व तो सपशेल फसला. तेव्हा केवळ विक्रीवर बंदी होती. उत्पादकांना मोकळे सोडण्यात आले होते. आता या दोन्हीवर बंदी घालण्याचे धाडस केंद्राने दाखवले असले तरी पर्यायी वापराच्या संदर्भात असलेला लोकशिक्षणाचा अभाव या निणयासमोरचे मोठे आव्हान असणार आहे. ७५ मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या पिशव्या, चमचे, डबे अशा १९ वस्तू आता वापरता येणार नाहीत. त्याऐवजी कागद, बांबू वा तागासारख्या नैसर्गिक सामग्रीपासून तयार केलेल्या वस्तू वापरा असे सरकार म्हणत असले तरी देशभरात मुबलक पुरवठा होईल एवढे या वस्तूंचे उत्पादन आहे का? प्लास्टिकच्या तुलनेत या पर्यायी वस्तू महाग आहेत. त्यामुळे त्या न वापरण्याकडे दुकानदार व ग्राहकांचा कल असतो. केंद्राने हा निणय घेताना कारवाईच्या पातळीवर पाच वर्षांची शिक्षा अथवा एक लाख रु.पर्यंत दंड अशी तरतूद केली. ही शिक्षा थोडी अतिरेकीच म्हणायला हवी. कारण यात नेहमी सामान्य लोकच भरडले जातात. मुळात प्लास्टिकचा वापर लोकांच्या एवढयाा अंगवळणी पडला आहे की त्यातून बाहेर पडण्यासाठी सर्वच पातळीवर जनजागृतीची गरज आहे. त्यामुळे केंद्र व राज्याच्या पातळीवर केवळ नियंत्रण कक्ष उभारून किंवा तक्रारीसाठी 'ॲप'सारखे पाऊल उचलून ही समस्या सुटणारी नाही. यातला दुसरा व महत्त्वाचा मुद्दा आहे तो एकाच वेळी उत्पादन व विक्रीवर बंदी घालण्याचा. ही बंदी येणार हे ऑगस्ट २०२१ पासून सांगितले गेले; परंतु याच काळात उत्पादकांनी भरपूर उत्पादन केले व ते वितरितसुद्धा केले. त्यामुळे बंदीच्या काळातही प्लास्टिकचा वापर सर्वत्र दिसेल. सरकारने आधी उत्पादनावर बंदी घातली असती व काही काळानंतर वापरावर बंधने घातली असती तर कदाचित चित्र वेगळे दिसले असते, असे जाणकार म्हणतात. या दोन्ही गोष्टी एकाच वेळी केल्याने गोंधळ तर उडेलच, शिवाय कारवाईच्या नावावर लाचखोरीलासुद्धा उधाण येईल. केवळ प्लास्टिकच नाही तर तंबाखूजन्य पदार्थाच्या बंदीबाबतसुद्धा सर्वत्र हेच चित्र बघायला मिळते. या वास्तवाचा विचार सरकारी पातळीवर झालेला दिसत नाही.

आजमितीला २.४ लाख टन एकेरी वापराच्या प्लास्टिकचे उत्पादन भारतात होते. देशात दररोज २६ हजार टन प्लास्टिकचा कचरा तयार होतो. त्यातला केवळ ६० टक्केच गोळा केला जातो. उर्वरित कचरा पर्यावरणाचे संतुलन बिघडवण्यात महत्त्वाची भूमिका बजावतो. प्लास्टिकच्या पुनर्वापराचे प्रमाण ६० टक्के असायला हवे. भारतात ते १२ ते १५ टक्केच्या पुढे सरकलेले नाही. त्यामुळे माती, पाणी इतकेच नाही तर पाळीव जनावरांसोबत वन्यप्राण्यांच्या शरीरातसुद्ध

थोडक्यात

विटा खाली करून येताना पिंजरच्या नदीमध्ये ट्रॅक्टर पलटी

विकास ठाकरे

अकोला : ३ जुलै सकाळी १० दरम्यान पातुर नंदापूर वरून विटाचा ट्रॅक्टर भरून गेला आणि विटा खाली केल्यानंतर पातुर नंदापूर ला येता वेळेस ट्रॅक्टर पलटी झाला. पिंजर येथील पुलावरून नदीत कोसळला , त्यात तीन मजूर गंभीर जखमी झाले असता संत गाडगेबाबा आपत्कालीन पथकाने अकोला येथे सामान्य रुग्णालयात हलवण्यात आले. हा ट्रॅक्टर वीट भट्टी मालक प्रवीण वाडकर यांचा असल्याचा समजलं. या जखमी मध्ये प्रवीण वाडकर, पंकज वाडकर, हर्षल सुरजुसे, या इसमाचा समावेश आहे.

आत्मा योजने अंतर्गत किसान गोष्टी कार्यक्रम संपन्न

महेश निमसटकर

भद्रावती : कृषी संजिवनी मोहीम सप्ताह अंतर्गत कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) अंतर्गत तालुका कृषी अधिकारी कार्यालयातर्फे किसान गोष्टी कार्यक्रम तालुक्यातील चंदनखेडा येथील कृषी मंडळ अधिकारी कार्यालयात नुकताच संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच नयन जांभुळे उपस्थित होते. तर प्रमुख अतिथी म्हणून कृषी उपसंचालक आर. जे. मनोहरे, तालुका कृषी अधिकारी मोहिनी जाधव उपस्थित होते. यावेळी मनोहरे यांनी कृषी विभागाच्या विविध योजनेबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमादरम्यान तालुक्यातील कृषी भूषण पुरस्कार प्राप्त शेतकरी दत्तात्रय गुंडावार व प्रयोगशील शेतकरी सुनील उमरे, दत्तू येरगुडे, बंडुजी ननावरे, मारोती गायकवाड, किशोर ठावरी, यांनी आपल्या शेती पध्दतीमध्ये वापरत असलेल्या तंत्रज्ञानाबाबत आपले अनुभव कथन केले. तसेच महानंदा ढोके व मनीषा ठावरी यांनी गटामार्फत चालू असलेल्या प्रक्रिया उद्योग बाबत माहिती दिली. याप्रसंगी शिंगाडा लागवड प्रक्षेत्रालाही भेट देण्यात आली.यावेळी उपस्थित शेतकऱ्यांना खतांचा संतुलीत वापर, पिकाची खत मात्रा बनविणे, सूक्ष्म मूलद्रव्यांचे महत्व, रासायनिक खतांच्या अति वापरामुळे होणारे दुष्परिणाम तसेच दशपर्णीअर्क, जीवामृत, गांडूळखत, नाडेप याबाबत कृषी पर्यवेक्षक पी. एम. ठेंगणे, विजय कवाडे, एम. एन. ताजने यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तालुका कृषी अधिकारी मोहिनी जाधव यांनी केले. संचालन व आभार प्रदर्शन सहाय्यक तंत्र व्यवसायी सुधीर हिवसे यांनी केले.कार्यक्रमाला तालुक्यातील शेतकरी मित्र, आत्मा नोंदणीकृत शेतकरी गटातील पुरुष व महिला शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपनीचे संचालक व सदस्य, अंबुजा फाउंडेशन, उमेद, माविम, गटातील महिला व शेतकरी बंधू व भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमच्या यशस्वीतेकरिता पी. जी. कोमटी, यु. बी. झाडे, अनिल भोई, कपिल शंकपाळे, प्रदिप काळे व सर्व कृषि सहाय्यक यांनी सहकार्य केले.

विद्यार्थ्यांच्या शाळा प्रवेशाचा केला जल्लोष

अविनाश पोहरे

पातूर : तुळसाबाई कावल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पातुर येथे प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला यामध्ये वर्ग पाचवीच्या विद्यार्थ्यांचे स्वागत एनसीसीच्या कॅडेट्सचं पथसंचलन करून केले आणि नवीन विद्यार्थ्यांसाठी सेल्फी बस चे पोस्टर तयार करून विद्यार्थ्यांना आनंददायी वातावरण विद्यालयांमध्ये उपलब्ध करून देण्यामध्ये प्राचार्य अंशुमानसिंह गहिलोत सर उपप्राचार्य एस बी चव्हाण उपमुख्याध्यापक आरएस ढेंगे पर्यवेक्षक एम बी परमाळे आणि सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी परिश्रम घेतले.

एकनाथ शिंदेंना अश्रू अनावर

साप्ता. अधिकारनामा

मुंबई : विधानसभेत विश्वासदर्शक ठराव जिंकल्यानंतर अभिनंदन प्रस्तावावर बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना अश्रू अनावर झाले. पक्षाप्रतिची निष्ठा, कुटुंबावर आलेला बिकट प्रसंग आणि बंडानंतर झालेली टीका याविषयी बोलताना मुख्यमंत्री शिंदे भावूक झाले. माझ्या कुटुंबाला प्राधान्य न देता मी कायम संघटनेसाठी झटत राहिलो. काही वेळा मी खचलोही, पण मला आनंद दिघेंनी आधार दिला, असेही शिंदेंनी सांगितले. मी बाळासाहेबांच्या विचाराने वेडा झालो होतो. आनंद दिघेंनी मला शाखाप्रमुख केले, असेही ते पुढे म्हणाले. यावेळी उद्धव ठाकरे आणि आईमधल्या संभाषणाची आठवणही करुन दिली. तसेच आपल्यावर रेडे, प्रेतं आणि सोबत असलेल्या महिला आमदारांना वेश्या, अशा टिप्पण्या केल्याबद्दल त्यांनी खंतही व्यक्त केली आहे. राज्यात अडीच वर्ष आम्ही सरकारमध्ये होतो. पण आम्हाला फार चांगले अनुभव आले नाही. स्वातंत्र्यवीर सावरकरांबाबत अपमानास्पद कोणी लिखाण केले, बाळासाहेबांचा मतदानाचा अधिकार कोणी काढला, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. आम्हाला गद्दार म्हटले गेले पण आम्ही कालही शिवसैनिक होतो आणि उद्याही शिवसैनिक राहणार असेही मुख्यमंत्री शिंदे यांनी म्हटले. मी शिवसेनेला वेळ दिला, शिवसैनिकांना मानतो. मी शिवसेनेला कुटुंब मानत असल्याचे त्यांनी म्हटले.

विधान परिषद निवडणुकीच्या दरम्यान अपमानास्पद वागणूक मिळाली. दिवंगत शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी आम्हाला अन्यायाविरोधात उभं राहण्यास सांगितले. विधान परिषदेच्या निवडणुकीनंतर बाहेर पडलो. लढून शहीद झालो तरी चालेल पण माघार नाही. शिवसेना वाचवण्यासाठी प्रयत्न करणार हे त्याच दिवशी ठरवलं असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले. शिवसेना आणि भाजपचे सरकार पुन्हा आले आहे. माझ्यावर विश्वास ठेवून शिवसेना व इतर अपक्ष असे ५० आमदार सोबत होते. माझ्यावर विश्वास ठेवून साथ दिली त्याबद्दल त्यांचे आभार मानतो. विरोधी पक्षातून सत्तेकडे जातात, असे नेहमी दिसून येतात. मात्र, आम्ही सत्तेतून विरोधात गेलो. महाराष्ट्रातील सत्तांतर ही ऐतिहासिक घटना आहे. या घटनेची फक्त आपल्याच देशाने नव्हे तर तब्बल ३३ देशांनी दखल घेतली असल्याचे मुख्यमंत्र्यांनी यावेळी म्हटले. शिंदे यांनी म्हटले की, एका बाजूला सत्ता, सरकारी यंत्रणा होती. तर दुसऱ्या बाजूला बाळासाहेब ठाकरे आणि आनंद दिघे यांचा सामान्य सैनिक होता. माझ्यासोबत आलेल्यां पैकी एकाही आमदाराने विचारलं नाही की किती दिवस लागतील. त्यांनी माझ्यावर विश्वास दाखवला, असेही ते म्हणाले. आम्ही स्वार्थासाठी नव्हे विचारांसाठी एकत्र आलो आहोत, असेही त्यांनी सांगितले.

आगीत छत्र हरविलेल्या कुटुंबाला डॉ. अंकुश आगलावे यांनी दिला मदतीचा हात

महेश निमसटकर

भद्रावती : अचानक लागलेल्या आगीत घरातील सामान जळून खाक झालेल्या भद्रावती तालुक्यातील टाकळी गावातील एका कुटुंबाला केंद्रीय मानवाधिकार संघटनेचे विदर्भ प्रदेश अध्यक्ष, गुरुदेव प्रचारक, समाजसेवक तथा कोरोना योद्धा डॉ. अंकुश आगलावे यांनी मदतीचा हात दिला आहे.तालुक्यातील टाकळी या गावात गोकुळ झिबला दानव यांच्या घरी दि.३० जून रोजी अचानक आग लागली. आगीचे कारण अद्यापही समजले नसून आग इतकी भयंकर होती की दानव यांचे घराचे संपूर्ण साहित्य आगीत जळून खाक झाले. त्यात टी.व्ही, फ्रीज व इतर मौल्यवान साहित्य यांचा समावेश आहे. या घटनेची माहिती डॉ. अंकुश आगलावे यांना मिळताच ते टाकळी येथे दाखल झाले. लगेच त्यांनी भद्रावतीचे तहसीलदार यांना भ्रमणध्वनीवरून घटनेची माहिती दिली. तहसीलदारांनी लगेच संबंधित तलाठी यांना मोक्का चौकशी करून पंचनामा करण्यास सांगितले. विद्युत महावितरण कंपनीलासुद्धा डॉ.आगलावे यांनी चौकशी करायला सांगितले. यावेळी सामाजिक बांधिलकी जोपासत डॉ. आगलावे यांनी स्वतः कडून दानव कुटुंबियांना तात्काळ पाच हजार रुपयांची मदत दिली. तसेच शासनाकडून भरीव आर्थिक मदत मिळण्यासाठी पाठपुरावा करणार असल्याचे डॉ. आगलावे यांनी सांगितले.दानव कुटुंबियातील कर्ता पुरूष मोलमजुरी करून आपले उदरनिर्वाह करतो. त्यातच कुटुंबियांची पालनपोषणाची व मुलांच्या शिक्षणाची जवाबदारी त्यांच्यावर आहे. मोलमजुरी करणाऱ्या दानव कुटुंबियांचे छत्र हरविले असल्याने ते कुटुंब आर्थिक संकटात सापडले आहे. यावेळी टाकळी गावातील नागरिक प्रभाकर मत्ते, निळकंठ दानव, शंकर खंडाळकर, बाबा बलकी, राजु आसेकर, राहुल बलकी, सचिन ढेंगळे, केशव देऊळकर, विक्रम पेटकर, मोरेकांत लेडाजे, मारोती खाडे, करण मत्ते व गावातील ज्येष्ठ नागरिक, गुरूदेव प्रचारक, केंद्रीय मानवाधिकार संगठनचे पदाधिकारी उपस्थित होते.

डॉ.शंकररावजी चव्हाण गुरूरत्न पुरस्कार २०२२ जाहीर

प्रा.नामदेवराव जाधव, मयंक गांधी, वैशाली माडे यांचा समावेश

सोनेराव गायकवाड

लातूर : दरवर्षी देण्यात येणारा डॉ.शंकररावजी चव्हाण गुरूरत्न पुरस्कार राजमाता जिजाऊचे वंशज प्रा.नामदेवराव जाधव यांच्यासह नऊ रत्नांना जाहिर करण्यात आला असून, दि.१३ जुलै २०२२ रोजी सायंकाळी ६ वाजता कुसूम सभागृह नांदेड येथे मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे. याच सोहळ्यात दरवर्षी ८ मार्च रोजी देण्यात येणारे कुसूमताई चव्हाण महिला भूषण पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. मीमांसा फाऊंडेशन, व्हाईस ऑफ मिडीया, समीक्षा, मंथन क्रिएटिव्ह ग्रुप, पत्रकार प्रेस परिषद व ह्यूमन राईट्स फाऊंडेशनच्यावतीने दरवर्षी माजी गृहमंत्री, पाणीदार नेतृत्व, मराठवाड्याचे भगीरथ श्रद्धेय डॉ.शंकररावजी चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त राज्यातीलच नव्हे तर देशातील नामवंत व्यक्तीमत्वांचा डॉ.शंकररावजी चव्हाण गुरूरत्न पुरस्कार देऊन सन्मानीत केल्या जातो. यंदाचे हे चौदावे वर्ष आहे. यावर्षी राजमाता जिजाऊचे वंशज तथा उद्योग मार्गदर्शक प्रा.नामदेवराव जाधव, ग्लोबल परळी मिशनच्या माध्यमातून दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना आधुनिक शेतीसह जल व्यवस्थापनाचे धडे शिकवणारे मार्गदर्शक मयंक गांधी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह भारतीय राजकारणातील अनेक दिग्गजांची कॉफी टेबल बुक्स तयार करून क्रिएटिव्ह सेवा देणारे डॉ.नरेंद्र बोरलेपवार, दुभंगलेले ओठावर हजारो शस्त्रक्रिया करून लातूर येथे मोफत उपचार केंद्र चालवणारे डॉ.विठ्ठलराव लहाने, ग्रामीण भागातून जाऊन सिने जगतात नामांकीत झालेल्या गायीका वैशाली माडे, समाजसेवाच ही ईश्वर सेवा मानून दिशा प्रतिष्ठानच्या माध्यमातून गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना मदत व गरजवंताना वैद्यकीय सेवा देणारे अभिजीत देशमुख, सैनिकी शाळेत विद्यार्थ्यांना देशभक्तीचे धडे देऊन आता इंग्रजी शाळेतही संस्कारक्षम पिढी घडवण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेणारे प्राचार्य सच्चीदानंद जोशी, शून्यातून विश्व निर्माण करत राजभोग आटासह वेग वेगळ्या व्यवसायात ब्रँड निर्माण करून शेकडोंना रोजगार देणारे विजय केंद्रे आणि खुलताबाद येथे शैक्षणीक संस्थेच्या मार्फत गरजूंना मदत करून सामान्य जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी पुढाकार घेणारे डॉ.मजहर खान यांना जाहिर करण्यात आला आहे. तरी सदरील पुरस्कार सोहळ्याला सर्वांनी उपस्थित राहण्याचे आवाहन मंथन क्रिएटिव्ह ग्रुपचे रामेश्वरजी धुमाळ, प्रदेश प्रभारी अरविंद जाधव, मराठवाडा अध्यक्ष सखाराम कुलकर्णी, माजी पदाधिकारी सरवर खान, सौ.संगीताताई बारडकर, सौ.उज्वला दर्डा, सौ.सुनिता राठोड, सौ.सविता गबाळे, श्रीमती उषा हडोळतीकर, सौ.अरूणा पूरी, सौ.प्रणीता भरणे, शिवहरी गाढे तथा संपादक रूपेश पाडमुख यांनी केले आहे.

निराधार विधवा महिलेच्या घरकुलासाठी पातुर तालुका विकास मंचाचे प्रयत्न

किरण कुमार निमकंडे

पातुर : मागच्या पावसाळ्यातील अतिवृष्टीने आगिखेड येथील कांताबाई तवंर या निराधार विधवा महिलेचं राहत घर कोसळलं होतं ही वार्ता सोशल मीडिया वर वा-यासारखी पसरली होती त्याची दखल घेत पातुर तालुका विकास मंचाचे संयोजक ठा.शिवकुमारसिंह बायस यांनी उघड्यावर आलेल्या निराधार विधवा महिलेच्या कुटूंबाला आशेचा एक नवा किरण दाखवत पुण्यातील राजपूत समाज संगठन पिंपरी चिंचवड शहर या संस्थेच्या आर्थिक मदतीच्या जोरावर अडीच लाख रूपये खर्चून त्यांच्या स्वप्नातील घराच्या निर्मितीला सुरवात केली. आर्किटेक कडून घराचा नकाशा बनवला तो ग्रामपंचायत कडे सादर करून शासनाच्या नियमानुसार बांधकामासाठी लागणारी आवश्यक परवानगी घेवून घरकुलाच्या पायाभरणीला सरपंच,उपसरपंच व स्थानिक मान्यवरांच्या शुभहस्ते पुजन करून सुरवात केल्या गेली.घराचे संम्पुर्ण बांधकाम हे आर सी सी असून संडास बाथरुम सह दोन मोठ्या खोल्या आहेत.आत्तापर्यंत घराचे ऐंशी टक्के काम उत्कृष्ट दर्जाचे झालेले असून संघटनेनी दिलेला अडीच लाखांचा निधी संपल्याने उर्वरीत राहीलेले बांधकाम पुर्ण करण्यासाठी जवळपास आणखी एक ते दिड लाख रुपयांची आवश्यकता भासत आहे.

अनेकांना मदतीसाठी विकास मंचाने साकडे घातले परंतु अद्याप पर्यंत कोणीही सामाजिक अथवा राजकीय पुढाऱ्यांनी कुठल्याही प्रकारची मदत केली नाही. बांधकाम सुरू असतांनाच प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत मिळणाऱ्या घरकुलासाठी लागणाऱ्या कागदपत्रांची जुळवाजुळव करून सरपंच व ग्रामसेवक यांच्या अनमोल सहकार्याने व त्यांच्या कडे वेळोवेळी योग्य पाठपुरावा करून या निराधार विधवा महिलेचे प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत मिळणारे घरकुल मंजूर करण्यात आले परंतु मागील पाच महिन्यांपासून सारखा पाठपुरावा करूनही याचा निधी लाभार्थी ला मिळत नाही.पातुर तालुका विकास मंचाने शासन दरबारी तसेच या भागाचे स्थानिक लोकप्रतिनिधी असलेले आमदार नितीन देशमुख यांच्या कडे याबाबत वारंवार पाठपुरावा केला, पत्रव्यवहार केला पण त्यावर शासन प्रशासन व लोकप्रतिनिधी यांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले.

कोणीच आपले म्हणने ऐकून घेत नसल्याचे स्पष्ट झाल्यावर ही बाब ठाकूर शिवकुमारसिंह बायस यांनी अकोल्याच्या जिल्हाधिकारी निमा अरोरा व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सौरभ कटीयार यांच्या लक्षात आणून दिली.त्यांनी याबाबत त्वरित माहिती घेतली व दफ्तर दिरंगाई करणाऱ्या ग्रामसेवकांवर निलंबनाची कार्यवाही केली तरीही हा प्रश्न येथे सुटला नाही म्हणून पातुर पंचायत समितीच्या गट विकास अधिकारी यांना विकास मंचाने निवेदन देवून आत्मदहन करण्याचा इशारा दिला होता.गट विकास अधिकारी यांनी या निवेदनाची तात्काळ दखल घेत आगिखेडला सण २०२१-२०२२ ला प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण आवास प्लस मध्ये इतरचा लक्षांक ५ असून इतरच्या लक्षांक मध्ये आणखी वाढ करून तो १० देण्यात यावा अशी विनंती प्रकल्प संचालक,जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा अकोला जिल्हा यांना त्यांच्या पत्राद्वारे केली आहे.यावर प्रकल्प संचालक काय निणर्य घेतात यावर पातुर तालुका विकास मंचाचे लक्ष लागले आहे. एकंदरीत सर्व सामान्य कुटुंबातील निराधार भूमिपुत्रांचा वाली या जगात कोणीही नसतो जोपर्यंत त्यांना समाजातील चांगल्या नागरिकांची साथ मिळत नाही.आगिखेडच्या निराधार विधवा महिला श्रीमती कांताबाई तवंर आजही आपला संसार उघड्यावर मांडून आपल्या स्वप्नातील घराचं स्वप्न रोज उघड्या डोळयांनी पाहत आहे.पावसाळ्यापुर्वी त्यांना आपल्या कुटूंबासह हक्काच्या घरात नेण्यासाठी समाजातील आणखी कोन धावून येते व माणुसकीचे दर्शन देते हे बघणे औत्सुक्याचे ठरेल. पातुर तालुका विकास मंच व राजपूत समाज संगठन पिंपरी चिंचवड शहर या संस्थांनी केलेल्या पायपीटला कधी यश संपादन होते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

वैद्यकिय शिक्षणासाठी सीएसआर च्या माध्यमातुन ७.५० लक्ष रू.निधीची मदत

महेश निमसटकर

भद्रावती : विधीमंडळ लोकलेखा समितीचे प्रमुख तथा माजी अर्थमंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांनी शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय चंद्रपूरच्या गरीब विद्यार्थ्याला मदतीचा हात दिला आहे. नचिकेत विजय लाखे या चंद्रपूरातील नगीनाबाग परिसरात विद्यार्थ्याला एमबीबीएस अभ्यासक्रमाचे प्रवेश शुल्क, पुस्तकांसाठी पैसे व नीट परिक्षेसाठी लागणारी मदत आ. मुनगंटीवार यांनी सीएसआर निधीतुन उपलब्ध करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांना यश प्राप्त झाले असून यासर्व आवश्यक बाबींसाठी ७.५० लक्ष रू. रक्कम या विद्यार्थ्याचे पुर्ण शिक्षण होईपर्यंत मिळणार आहे.विविध विकासकामांसाठी सीएसआरच्या माध्यमातुन निधी उपलब्ध करण्यासाठी लौकीकप्राप्त असलेल्या आ. मुनगंटीवार यांनी असंख्य रूग्णांना वैद्यकिय मदत मिळवून देण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभी केली आहे. नचिकेत लाखे या गरीब विद्यार्थ्याच्या वैद्यकिय शिक्षणासाठी मदत मिळवून देत आ. मुनगंटीवार यांनी या विद्यार्थ्याचे भविष्य उज्वल होण्यासाठी पुढाकार घेतला आहे. या विद्यार्थ्याच्या पालकांनी आ. मुनगंटीवार यांचे आभार व्यक्त केले आहे.

सुप्रियाताई सुळे यांच्या वाढदिवसा निमित्त वृक्षारोपण कार्यक्रम साजरा

महेश निमसटकर

भद्रावती : राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या नेत्या आदरणीय खासदार सुप्रियाताई सुळे यांच्या वाढदिवसा निमित्त भद्रावती तालुक्यात तील भाथाडी या गावात वृक्षारोपण करण्यात आले यावेळी विविध जातीचे पर्यावरण पूरक असे झाड लावण्यात आले या कार्यक्रमाला राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे प्रदेश प्रतिनिधी मुनाज शेख तालुका अध्यक्ष राष्ट्रवादी कॉंग्रेस सुधाकर रोहनकर यांच्या हस्ते झाड लावण्यात आले यावेळी त्या गावातील नागरिक महिला व युवक उपस्थित होते या कार्यक्रमाचे आयोजन विलास सातपुते मंगेश रासेकर विठ्ठल तुरारे राजू रासेकर विनोद विधाते यांनी केले.

कालीमाता विटंबना प्रकरणी दिग्दर्शिकेच्या अटकेची मागणी

साप्ता. अधिकारनामा

मुंबई : चित्रपट निर्मात्या-दिग्दर्शक लीना मणिमेकलाई यांनी २ जुलै २०२२ रोजी आपल्या ट्विटर अकाऊंटवर 'काली' या माहितीपटाचे अर्थात डॉक्युमेंट्रीचे पोस्टर शेअर केले होते. या पोस्टरसह कॅप्शन लिहिताना त्या म्हणाल्या की, मी खूप उत्साहित आहे कारण 'काली' हा माहितीपट कॅनडा चित्रपट महोत्सवात लॉंच करण्यात आला होता. मात्र या पोस्टमुळे नेटकरी प्रचंड संतापले असून, त्यांनी केंद्रीय गृहमंत्रालय, अमित शाह आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना टॅग करत कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे. इतकेच नाही तर, अटक करण्यात यावी अशीही मागणी करण्यात आली आहे. या माहितीपटाच्या पोस्टरमध्ये काली माता साकारणारी अभिनेत्री सिगारेट ओढताना दाखवण्यात आली आहे. इतकेच नाही तर, काली मातेच्या हातात एलजीबीटीक्यू वर्गाचा झेंडाही दाखवण्यात आला आहे.

लीना यांनी हे पोस्टर त्यांच्या ट्विटर अकाऊंटवर शेअर केले होते. यानंतर आता लीना यांना तात्काळ अटक करण्याची मागणी करण्यात येत आहे. दरम्यान दिल्लीतील एका वकिलांनी आज दिग्दर्शिका लीना मनिमेकलाई यांच्या विरोधात पोलिसात तक्रार दाखल केली. वकील जिंदाल म्हणाले देवी कालीला स्मोकिंग दाखवून धार्मिक भावना दुखावल्या गेल्या आहेत. जे आक्षेपार्ह आहे. ते कोणत्याही प्रकारे स्वीकारले जाऊ शकत नाही. संबंधितांवर तत्काळ गुन्हा नोंदवण्याची मागणी केली आहे.

सेवामुक्ती नंतरही अग्निवीरांना मिळणार निःशुल्क उपचार

साप्ता. अधिकारनामा

नवी दिल्ली : केंद्र सरकारने या अग्नीवीरांसाठी आणखी एक सवलत जाहीर केली आहे. त्यानुसार सेवाकाळात जखमी झालेल्या अग्नीवीरांना २३ व्या वर्षानंतर सैन्यदलांतून सेवामुक्त झाल्यावरही मोफत उपचार करण्याचा प्रस्ताव जाहीर करण्यात आला आहे. योजनेला झालेला हा विरोध पहाता केंद्र सरकारने टप्प्याटप्प्याने दिलासा देणाऱ्या घोषणा सुरू केल्या आहे. निमलष्करी दलांमध्ये, राज्यांच्या पोलिस दलांमध्ये ७५ टक्के सेवामुक्त अग्नीवीरांना राखीव जागा ठेवण्याच्या घोषणा टप्प्याटप्याने करण्यात आल्या आहेत. याच दरम्यान हवाई दलाने त्यांच्या कोट्यातील ३ हजार अग्नीवीरांची ऑनलाईन भरती मोहीम सुरू केली. पहिल्या केवळ ६ दिवसांत हवाई दलाकडे तब्बल २ लाखांहून जास्त तरूणांनी अर्ज केले. या पार्श्वभूमीवर संरक्षण मंत्रालयाकडून अग्नीवीरांसाठी एका नवीन सवलतीची घोषणा आज करण्यात आली.

त्यानुसार सेवाकाळात जखमी झालेल्या व दीर्घ उपचारांची गरज असलेल्या अग्नीवीरांना सेवामुक्त केल्यावरही मोफत उपचारांची सुविधा कायम ठेवण्यात येणार आहे. योग्यता व कामगिरीच्या आधारावर लष्करी सेवेतून ४ वर्षांनी मुक्त केले जाणाऱ्या ७५ टक्के तरूणांना जे ११.७१ लाख रूपयांचे सेवा निधी पॅकेज मिळणार आहे. त्याच्या व्यतिरिक्त हे मोफत उपचार असतील असेही स्पष्ट करण्यात आले. संबंधित अग्नीवीर गंभीर जखमी झाले असतील व त्यांना दीर्घ उपचारांची गरज असेल त्यांच्यावर त्या कालावधीत लष्कराच्या नियमांनुसार सैन्यदलांच्या रूग्णालयांत उपचार करण्यात येतील. सेवाकाळात गंभीर जखमीझाल्यास १५ लाखांपासून ४४ लाखांपर्यंत भरपाई देण्याची तरतूद मूळ योजनेत यापूर्वीच करण्यात आली आहे.

थोडक्यात

एकनाथ शिंदेंना पांडुरंगाच्या पूजेसाठी पंढरपूरचं आमंत्रण

साप्ता. अधिकारनामा

ठाणे : राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पांडुरंगाच्या पुजेसाठी मंगळवारी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या सदस्यांनी सहपरिवारासह आमंत्रित केले. मंगळवारी मंदिर समितीचे सदस्य ठाण्यातील एकनाथ शिंदे यांच्या लुईसावाडी येथील निवासस्थानी आले होते. एकनाथ शिंदे यांना वारकरी फेटा, उपरणे, वीणा आणि पाडुंरंगाची तसबीर देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. आषाढी एकादशीच्या दिवशी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पूजा केली जाते. यावर्षीच्या पूजेचा मान हा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मिळणार आहे. त्यामुळे एकनाथ शिंदे यांना आमंत्रित करण्यासाठी श्री विठ्ठल रक्मिणी मंदिर समितीच्या सदस्यांनी त्यांच्या लुईसवाडी येथील शुभ दीप निवासस्थानी जाऊन भेट घेतली. त्यामध्ये समितीचे सह अध्यक्ष ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर, पंढरपूर प्रांत अधिकारी आणि मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी गजानन गुरव तसेच इतर सदस्य उपस्थित होते. यावेळी एकनाथ शिंदे यांना वारकरी फेटा, उपरणे, वीणा आणि पांडुरंगाची तसबीर देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.

कोकण ,अमरावतीत मुसळधार पाऊस

साप्ता. अधिकारनामा

मुंबई : गेल्या काही दिवसांपासून राज्यात अनेक ठिकाणी पावसास सुरुवात झाली आहे. कोकणसह आमरावतीतील काही भागांमध्ये पूरजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपत्ती व्यवस्थापनासह इतर यंत्रणांना सज्ज राहण्याचे निर्देश दिले आहेत. राज्यातील विविध जिल्ह्यात राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन दल (एनडीआरएफ) आणि राज्य आपत्ती व्यवस्थापन दलाच्या (एसडीआरएफ) ११ टीम तैनात करण्यात आल्या आहेत. तसेच बेस स्टेशनवर एनडीआरएफच्या ९ आणि एसडीआरएफच्या ४ अशा एकूण १३ टीम सज्ज ठेवण्यात आल्या आहेत. राज्यातील संपूर्ण कोकणसह अमरावती विभागातील काही तालुक्यांमध्ये जोरदार पाऊस होत आहे. त्यामुळे काही ठिकाणी पूरपरिस्थिती निर्माण झाली आहे. तसेच काही ठिकाणी नदीच्या पातळीत होणारी वाढ लक्षात घेऊन खबरदारीचा उपाय म्हणून स्थानिक पातळीवर उपाय योजना करण्यात येत आहेत. तसेच आवश्यक असणाऱ्या ठिकाणी राष्ट्रीय आणि राज्य आपत्ती व्यवस्थापन दलाच्या टीम तैनात करण्यात आल्या आहेत.

आज दुपारी १२ वाजेपर्यंत कोकण विभागातील पालघर जिल्ह्यात गेल्या २४ तासात सरासरी १०० मिमी. पेक्षा जास्त पाऊस झाला आहे. जिल्ह्यात पावसाचा जोर वाढत असून हवामान विभागाकडून अतिवृष्टीची शक्यता वर्तवण्यात आली आहे. मुंबईत गेल्या २४ तासात कुलाबा येथे ११७ मिमी तर सांताक्रूझ येथे १२४ मिमी पावसाची नोंद झाली आहे. रत्नागिरी जिल्ह्यात सद्यस्थितीत पूर परिस्थिती नाही. मात्र, जिल्ह्यातील २ नद्या इशारा पातळीच्या वर वाहत असून जिल्हा प्रशासन सतर्क आहे. तसेच वारंवार दरड कोसळण्याच्या घटना घडत असल्याने सुरक्षेच्या कारणास्तव मुंबई- गोवा महामार्गावरील परशुराम घाट वाहतुकीसाठी बंद करण्यात आला असून वाहतूक अन्य मार्गाने वळण्यात आली आहे. पुणे विभागातील कोल्हापूर जिल्ह्यात सद्यस्थितीत पूर परिस्थिती नाही, मात्र नद्यांच्या पाणी पातळीत वाढ होत असल्याने एनडीआरएफच्या दोन तुकड्या तैनात करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तर अमरावती जिल्ह्यातील तिवसा तालुक्यातील चांदूरबाजार आणि मोर्शी येथे पूरजन्य परिस्थिती निर्माण झालेली असून गावातील लोकांना सुरक्षित स्थळी नेण्याचे काम सुरु असून, सद्यस्थितीत जिल्ह्यात स्थानिक

राज्यभरातील तरुण-तरुणी 'रेव्ह पार्टी' साठी नागपुरात

साप्ता. अधिकारनामा

नागपूर : युवक कॉंग्रेसचे प्रदेश सरचिटणीस साईश वारजूरकर याने जामठा-खरसमारी गावाजवळील गिरनार फार्महाऊसमध्ये आयोजित केलेल्या 'रेव्ह पार्टी 'ची समाजमाध्यमांवर जाहिरात करण्यात आली होती व त्यात सहभागी होण्यासाठी राज्यभरातील तरुण-तरुणी नागपुरात आल्या होत्या. पार्टीत विदेशी मद्याची सोय करण्यात आली होती, अशी माहिती पोलीस सूत्रांनी दिली. सईश वारजूरकर हा चंद्रपूरचा आहे. त्याने ही पार्टी आयोजित केली होती. पार्टीसाठी १० दिवसांपासून समाजमाध्यमांवर जाहिरात केली जात होती. तसेच पार्टीसाठी ग्रामपंचायत, राज्य उत्पादन शुल्क विभाग आणि संबंधित विभागाची परवानगी घेण्यात आली. मात्र ती उशिरा रात्रीपर्यंत सुरू होती. आयोजकांनी कारवाई टाळण्यासाठी हिंगणा पोलिसांशी हातमिळवणी केली. त्यामुळेच तेथील सुरक्षेसाठी काही पोलीस कर्मचाऱ्यांकडे जबाबदारी देण्यात आली होती.

या पार्टीत पुणे, मुंबईसारख्या शहरातून शेकडो तर इतर भागातून अंदाजे तीन हजार तरुण-तरुणी गिरनार फार्महाऊसमध्ये आल्या होत्या. त्यांच्यासाठी सहआयोजक छगन कुवजीभाई पटेल (६५) आणि शिव वडेट्टीवार (३२) रहाटे कॉलनी यांनी महागडी विदेशी दारू आणि अन्य अंमली पदार्थांची व्यवस्था केली होती. मध्यरात्री कर्णकर्कश संगीताच्या तालावर नशेत तरुण-तरुणी नृत्य करीत होते. कोट्यवधीचा खर्च या पार्टीवर करण्यात आला होता. पोलिसांचा छापा आणि पार्टीत पळापळ पोलीस उपायुक्त गजानन राजमाने यांना मध्यरात्री रेव्ह पार्टीची माहिती मिळाली. त्यांनी लगेच पोलीस कर्मचाऱ्यांसह तेथे छापा घातला. त्यामुळे पार्टीत एकच गोंधळ उडाला. तरुण-तरुणींनी दिसेल त्या मार्गाने पळ काढला. अनेकांनी विमानतळाच्या दिशेने धाव घेत पुणे-मुंबई गाठण्याचा प्रयत्न केल्याची माहिती आहे.

शाळा सुरु होऊनही शाळांमध्ये कैद्यांचे विलगीकरण सुरूच

साप्ता. अधिकारनामा

ठाणे : कोरोनाच्या काळात विटावा येथील ठाणे महापालिकेच्या शाळेत कैद्यांसाठी विलगीकरण कक्ष सुरु करण्यात आला होता. मात्र, आता शाळा सुरु झाल्यानंतरही हा कक्ष बंद करण्यात आला नसल्याची बाब समोर आली आहे. त्यामुळे शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या समोरच कैद्यांना या विलगीकरण कक्षात आणले जात असल्याने पोलीस आणि कैदी बघून शाळेतील विद्यार्थी अक्षरशः घाबरले आहेत. शाळा हे ज्ञान दानाचे पवित्र स्थान असून या ठिकाणचा विलगीकरण कक्ष बंद करून मुलांच्या मनावर होणारा परिणाम थांबवावा अशी मागणी आता पालक वर्गाकडून होत आहे. पालिका प्रशासनाने यासांदर्भात त्वरित निर्णय घेतला नाही तर आंदोलन करण्याचा इशारा देखील पालकांनी दिला आहे.

कोरोनाच्या पाहिल्या आणि दुसऱ्या लाटेत ठाणे महानगरपालिकांच्या शाळा कोविड सेंटर म्हणून वापरण्यात येत होत्या. विटावा परीसरात असलेली ७२ क्रमांकाची शाळा देखील कोविड सेंटर म्हणून जिल्हा प्रशासनाने कोराना काळात ताब्यात घेतली होती. त्या ठिकाणी त्या शाळेचे रूपांतर कोविड सेंटर आणि विलगीकरण कक्ष अशा दोन भागात केले होते. गेल्या वर्षी ठाणे मध्यवर्ती कारागृहात कोरोना रुग्णांची संख्या मोठी होती. कारागृहातील अधिकारी, कर्मचारी यांनी घेतलेली काळजी तसेच बाहेरून येणाऱ्या नवीन कैदी अथवा न्यायबंदीला कोरोना चाचणीच्या अहवाल शिवाय कारागृहात प्रवेश दिला जात नव्हता. बाहेरून येणारे नवीन कैदी अथवा न्यायबंदी (न्यायालयीन कोठडीतील आरोपी) यांचा कोरोना चाचणीचा अहवाल तपासला जात होता, ज्या कैद्यांचे कोरोना अहवाल पॉझिटिव्ह असतील त्यांची रवानगी कोविड सेंटरमध्ये केली जायची आणि ज्याचे अहवाल निगेटिव्ह असतील त्यांची रवानगी विलगीकरण कक्ष येथे १४ दिवसांसाठी केली जायची, १४ दिवसानंतर विलगीकरण कक्षेतील कैदी अथवा न्यायबंदीला कारागृहात प्रवेश दिला जात होता. तेथेही काही दिवस त्याला डॉक्टरांच्या देखरेखीखाली ठेवले जात होते. पॉझिटिव्ह असलेल्या कैद्यावर शाळेतील कोविड सेंटरमध्ये उपचार करून त्याचा अहवाल निगेटिव्ह येईपर्यंत ठेवले जायचे. दोन वर्षानंतर कोरोनाची लाट काही प्रमाणात ओसरली आहे. परंतु विटावा येथील कैद्यांसाठी सूरू करण्यात आलेला विलगीकरण कक्ष अद्याप बंद करण्यात आलेले नाही. कच्चे कैदी ठेवण्यासाठी अद्याप या शाळेच्या वर्गाचा उपयोग जिल्हा कारागृह प्रशासनना कडून होत असल्याची माहिती विद्यार्थ्यांचे पालक देत आहेत. एकीकडे शाळा सुरू असून या शाळेत पहिली ते सातवी इयत्ताचे वर्ग नियमित भरत आहेत. या ठिकाणीं कैदी आणि पोलिसांचा नियमित वावर पाहून बालमनावर त्याचा परिणाम असल्याने पालकांची चिंता वाढली आहे.या संदर्भात शाळेच्या वरिष्ठ शिक्षकांनी अनेकदा अर्ज विनंती करून देखील प्रशासन स्तरावर प्रतिसाद मिळत नसल्याने शिक्षक गण देखील मेटाकुटीला आले आहेत. शाळा भरण्या आणि सुटण्याच्या वेळेत या ठिकाणी पोलिस कैद्यांची ने-आण करत असतात या संदर्भात पालकांनी देखील आवाज उठवण्याचा प्रयत्न केला. परंतु, यश येत नसल्याने पालक आंदोलनाच्या तयारीत आहेत.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून कोल्हापूर जिल्ह्याच्या पूरपरिस्थितीचा आढावा

साप्ता. अधिकारनामा

कोल्हापूर : जिल्ह्यात सध्या मुसळधार पाऊस सुरु असताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे दूरध्वनीद्वारे सद्यस्थितीची माहिती घेतली. "पूरपरिस्थितीच्या अनुषंगाने आवश्यक ते सर्व सहकार्य राज्य शासन करेल", असे त्यांनी सांगितले आहे. तसेच एनडीआरएफच्या २ तुकड्या आज रात्री जिल्ह्यात दाखल होत आहेत, असे सांगून पूरपरिस्थिती उद्भवल्यास सर्वांनी दक्ष राहून आपापल्या जबाबदाऱ्या चोखपणे पार पाडाव्यात,' अशा सक्त सूचना जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांनी सर्व यंत्रणांना दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयातील शाहूजी सभागृहात जिल्हाधिकारी रेखावार यांच्या अध्यक्षतेखाली पूर व्यवस्थापन आढावा बैठक घेण्यात आली, यावेळी ते बोलत होते. बैठकीला महानगरपालिका प्रशासक डॉ. कादंबरी बलकवडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजयसिंह चव्हाण, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त नितीन देसाई, अतिरिक्त पोलीस अधीक्षक तिरुपती काकडे, अपर जिल्हाधिकारी किशोर पवार, प्र. निवासी उपजिल्हाधिकारी दत्तात्रय कवीतके, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी प्रसाद संकपाळ तसेच विविध यंत्रणांचे प्रमुख उपस्थित होते.

जिल्हाधिकारी रेखावार म्हणाले, संततधार पावसामुळे पंचगंगेच्या पाणीपातळीत झपाट्याने वाढ होत असून सध्या पाणीपातळी २६ फुटांवर आहे, तर जिल्ह्यातील २० बंधारे पाण्याखाली गेले आहेत. पब्लिक अड्रेस सिस्टीम व अन्य माध्यमांद्वारे जिल्ह्यातील पूरपरिस्थितीची अद्ययावत माहिती नागरिकांपर्यंत जलदगतीने पोहोचवा. पुरबाधित नागरिक व जनावरांचे वेळेत सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करा. स्थलांतरितांच्या कॅम्पमध्ये नागरिकांना अन्न, पाणी, विद्युत पुरवठा, स्वच्छतागृह, आरोग्य सुविधा आदी आवश्यक त्या सोयी-सुविधा उपलब्ध करुन द्या. जनावरांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यासाठी ठिकाणे निश्चित झाली असून जनावरांना हलवण्यासाठी वाहनांची माहिती पशुपालकांना द्या. पुराच्या पाण्यात पंप बुडून पाणीपुरवठा बंद झाल्यास टँकरने पाणीपुरवठ्याची सोय करा. घाटमाथ्यावर पावसाचे पाणी अडून भूस्खलन, दरडी कोसळण्याच्या घटना घडू नयेत, यासाठी वनविभागाने घाटमाथ्यावरील पाण्याचे स्रोत मोकळे करावेत. रस्त्यावर पुराच्या पाणी आल्यास याठिकाणी वाहने अडकून दुर्घटना घडू नयेत, यासाठी याठिकाणी दोन्ही बाजूला पुरेसा पोलीस बंदोबस्त लावण्याबरोबरच बॅरिकेड्स लावा. पूरपरिस्थितीच्या पार्श्वभूमीवर अतिरिक्त भाजीपाला व दुग्धसाठा तयार ठेवण्याबाबत दुग्धजन्य संस्थांना कळवा, अशा सूचना देवून पूरपरिस्थितीच्या अनुषंगाने विभागनिहाय कामाचा आढावा जिल्हाधिकारी रेखावार यांनी घेतला. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये. माहिती हवी असल्यास आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या १०७७ टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन त्यांनी केले. पूरपरिस्थिती उद्भवल्यास यंत्रणा

संविधान जनतेला लुटण्यासाठी आहे, केरळच्या मंत्र्याचे वादग्रस्त विधान

साप्ता. अधिकारनामा

पथनमथिट्टा : केरळचे मंत्री साजी चेरियन यांनी देशाच्या संविधानावर प्रश्न उपस्थित केले आहेत. संविधानावर टीका करताना ते म्हणाले की, संविधान शोषण करणाऱ्यांना माफ करते. देशातील जास्तीत जास्त लोकांना लुटता येईल, अशा पद्धतीने लिहिले आहे. या विधानामुळे पिनाराई विजयन सरकारच्या वरिष्ठ मंत्र्यांवर प्रमुख विरोधी पक्ष कॉंग्रेससह विविध गटांकडून हल्लाबोल करण्यात येत आहे. तसेच चेरियन यांना बडतर्फ करण्याची मागणी भाजपने केली आहे. तर केरळ विधानसभेतील विरोधी पक्षनेते व्ही.डी. सतीशन यांनी कायदेशीर कारवाईचा इशारा दिला आहे. अलाप्पुझा जिल्ह्यातील चेंगन्नूर विधानसभा मतदारसंघातून दोन वेळा आमदार राहिलेले चेरियन हे केरळ सरकारमध्ये सांस्कृतिक आणि मत्स्यव्यवसाय खात्याचे मंत्री आहेत. दक्षिण जिल्ह्यातील मल्लापल्ली येथे नुकत्याच झालेल्या एका राजकीय कार्यक्रमात त्यांनी हे विधान केले आहे. मंगळवारी प्रादेशिक दूरचित्रवाणी वाहिन्यांनी चेरियन यांचे भाषण प्रसारित केल्यानंतर राजकीय वातावरण तापले आहे.

इंडियन एक्सप्रेसच्या वृत्तानुसार, चेरियन यांनी कार्यक्रमात सांगितले की, ठमानवतेच्या सुरुवातीपासून शोषण अस्तित्वात आहे. सध्याच्या काळात श्रीमंत लोक जग जिंकत आहेत. सरकारी यंत्रणा या प्रक्रियेला अनुकूल असणे स्वाभाविक आहे. प्रत्येकजण म्हणेल की आमच्याकडे एक चांगले लिहिलेले संविधान आहे, पण मी म्हणेन की देशाचे संविधान अशा प्रकारे लिहिले गेले आहे की, जास्तीत जास्त लोकांना लुटता येईल." चेरियन पुढे म्हणाले की, "ब्रिटिशांनी जे तयार केले, ते भारतीयांनी लिहिले आहे. हे गेल्या ७५ वर्षांपासून लागू आहे. देशातील जनतेला लुटण्यासाठी हे सुंदर संविधान आहे, असे मी म्हणेन. लोकशाही आणि धर्मनिरपेक्षता अशा काही चांगल्या गोष्टी राज्यघटनेत असल्या तरी त्याचा उद्देश सर्वसामान्यांचे शोषण करणे हा आहे.ठ केरळ विधानसभेतील विरोधी पक्षनेते व्ही.डी. सतीशनसह अनेकांनी चेरियन यांच्या वक्तव्यावर टीका केली आहे. सतीशन म्हणाले की, 'जर सीएम विजयन यांनी चेरियनवर कारवाई केली नाही तर आम्ही कायद्याचा सहारा घेऊ.' टाईम्स नाऊच्या वृत्तानुसार, चेरियन यांच्या 'असंवैधानिक' विधानांवर भाजपचे केजे अल्फोन्स यांनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करताना म्हटले आहे की, "केरळचे कॅबिनेट मंत्री, लोकप्रतिनिधी असूनही त्यांनी संविधानाच्या रक्षणाची शपथ घेतली होती, तरीही ते संविधानाची खिल्ली उडवत आहेत. हे योग्य नाही. मुख्यमंत्री पिनाराई विजयन यांनी त्यांना तात्काळ बडतर्फ करावे किंवा राज्यपालांनी मुख्यमंत्र्यांना

१५ जुलैपासून बदलणार गुंतवणुकीचे नियम

साप्ता. अधिकारनामा

नवी दिल्ली : तुम्हीही एनपीएसमध्ये गुंतवणूक करत असाल तर ही बातमी तुमच्या महत्त्वाची आहे. येत्या १५ जुलैपासून नॅशनल पेन्शन सिस्टिममध्ये गुंतवणूक करणे पूर्वीपेक्षा अधिक सुरक्षित होईल. पेन्शन फंड रेग्युलेटरी अँड डेव्हलपमेंट अथॉरिटीच्या वतीने एक परिपत्रक जारी करून गुंतवणूकदारांना एनपीएसमधील जोखीम प्रोफाइलबद्दल माहिती देण्यासाठी नियम देण्यात आले होते. त्याचा उद्देश गुंतवणूकदारांमध्ये जागरूकता वाढवणे हा होता. यासोबतच स्वतःच्या गुंतवणुकीचे निर्णय स्वतः घेऊ शकतात आणि जास्तीत जास्त परतावा मिळवू शकतात, याचीही गुंतवणूकरांसाठी जागरुकता करणे होता. परिपत्रकानुसार, आता पेन्शन फंडाला त्रैमासिक आधारावर १५ दिवसांच्या आत वेबसाइटवर सर्व योजनांचे जोखीम प्रोफाइल शेअर करावे लागतील. पीएफआरडीएने गुंतवणूकदारांना जोखीम प्रोफाइलची माहिती देण्यासाठी नियम केले आहेत. या नियमांनुसार, कमी, कमी ते मध्यम, मध्यम, मध्यम उच्च, उच्च आणि अतिशय उच्च असे सहा स्तर तयार केले आहेत.

विशेष बाब म्हणजे जोखीम प्रोफाइलचे विश्लेषण तिमाही आधारावर केले जाईल. टियर-१ आणि टियर-२, ॲसेट क्लास इक्विटी (ई), कॉर्पोरेट डेट (सी), सरकारी सिक्युरिटीज (जी) आणि स्कीम ए असणाऱ्या पेन्शन फंड योजनांची जोखीम प्रोफाइलबद्दल सांगणे आवश्यक आहे. पीएफआरडीएच्या परिपत्रकात असेही म्हटले आहे की, इस्ट्रूमेंटच्या कंझरव्हेटिव्ह रेटिंगच्या आधारावर ० ते १२ चे क्रेडिट जोखीम मूल्य दिले जाईल. ० क्रेडिट मूल्य हाय क्रेडिट क्वालिटीला दर्शवते, तर १२ क्रेडिट मूल्य सर्वात कमी क्रेडिट क्वालिटीला दर्शवते. प्रत्येक तिमाहीच्या शेवटच्या १५ दिवसांत 'Portfolio Disclosure' या कलमांतर्गत संबंधित पेन्शन फंडाच्या वेबसाइटवर जोखीम प्रोफाइलची माहिती दिली जाईल. ३१ मार्चपर्यंत वार्षिक आधारावर योजनांची जोखीम स्तर आणि वर्षभरात किती वेळा जोखीम स्तर बदलला आहे, हे पेन्शन फंडाच्या वेबसाइटवर प्रकाशित केले जाईल.

कुंभार्ली घाटात दरड कोसळली, मार्ग बनतोय धोकादायक



साप्ता. अधिकारनामा

चिपळूण : याआधी खड्यांमुळे कुंभार्ली घाट रस्ता मृत्युचा सापळा बनला होता. मात्र आता दरडीमुळे हा मार्ग धोकादायक ठरू लागला आहे. आज, मंगळवारी दुपारी २ वाजता या घाटात पुन्हा दरड कोसळली. दरड किरकोळ स्वरूपाची असल्याने काही वेळातच रस्त्यावरील माती हटवून मार्ग सुरु ठेवण्यात आला. गुहागर -विजापूर मार्गावरील हा घाट कोकण व पश्चिम महाराष्ट्राला जोडतो. १८ कि.मी लांबीच्या घाट रस्त्यात अनेक नागमोडी वळणे आहेत. गतवर्षीच्या पावसाळयात घाटात अनेक ठिकाणी दरडी कोसळल्या. मोठ्या दरडी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून हटवण्यात आल्या. मात्र आता पुन्हा या घाटात दरडीचे सत्र सुरू झाले आहे.

पंधरा दिवसांपूर्वी या घाटात दरड कोसळल्यानंतर बऱ्याच वेळाने तेथे यंत्रणा पोहचली होती. या विषयावरून प्रांताधिकारी प्रवीण पवार यांनी नुकत्याच झालेल्या आढावा बैठकीत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना धारेवर धरले होते. कुंभार्ली घाटात दरड कोसळल्याची माहिती तहसीलदार अथवा आपत्ती व्यवस्थापन कक्षाला मिळालीच नाही. थेट जिल्हा आपत्ती नियंत्रण कक्षात ही माहिती देण्यात आली. ही बाब गंभीर असल्याचे सुनावले होते. त्यानुसार मंगळवारी ही दरड कोसळल्याची घटना घडताच आपत्ती व्यवस्थापन विभागाला माहिती देण्यात आली. त्याप्रमाणे तातडीने जेसीबी नेऊन रस्त्यावरील माती दगड हटविण्यात आले. यानंतर या घाटातून वाहतूक सुरु ठेवण्यात आली आहे.

शिष्यवृत्ती परीक्षेची प्रवेशपत्रे उपलब्ध

साप्ता. अधिकारनामा

पुणे : महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे पाचवी आणि आठवीची शिष्यवृत्ती परीक्षा २० जुलैला आयोजित करण्यात आली आहे. या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे परीक्षा परिषदेकडून शाळांच्या लॉग इनमध्ये उपलब्ध करून देण्यात आली असून, शाळांनी प्रवेशपत्र विद्यार्थ्यांना देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. राज्य परीक्षा परिषदेच्या आयुक्त शैलजा दराडे यांनी ही माहिती दिली. पाचवी आणि आठवीची शिष्यवृत्ती परीक्षा दरवर्षी जानेवारी-फेब्रुवारीमध्ये होते. मात्र करोनाचा प्रादुर्भाव आणि टीईटी परीक्षेतील घोटाळा उघडकीस आल्याने परीक्षा परिषदेत पोलिसांकडून करण्यात येणारा तपास आदी कारणांमुळे परीक्षा लांबणीवर पडली. आता २० जुलैला राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये एकाच दिवशी घेण्यात येणार आहे. या परीक्षेचे प्रवेशपत्रे १ जुलैपासून संबंधित शाळेच्या लॉग इनमध्ये उपलब्ध करून देण्यात आली आहेत. त्यामुळे मुख्याध्यापकांनी प्रवेशपत्र डाऊनलोड करून त्याची मुद्रित प्रत काढून सर्व परीक्षार्थ्यांना तातडीने वितरीत करावे. तसेच परीक्षार्थी, पालक यांनी शाळेच्या मुख्याध्यापकांकडून प्रवेशपत्र प्राप्त करून घ्यावे, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

परीक्षेसाठी परीक्षा केंद्र निश्चितीचे काम पूर्ण झालेले आहे. तर परीक्षेसाठी शिक्षणाधिकारी 'जिल्हा समन्वयक' तर गटशिक्षणाधिकारी, वॉर्ड ऑफिसर हे 'तालुका समन्वयक' म्हणून काम पाहणार आहेत. परीक्षेसाठी ३१ डिसेंबरपूर्वी सेवानिवृत्त होत नसलेले शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्र प्रमुख, मुख्याध्यापक किंवा पदवीधर शिक्षक यांची केंद्र संचालक म्हणून नियुक्ती करावी. केंद्र प्रमुख, मुख्याध्यापक किंवा पदवीधर शिक्षक उपलब्ध नसल्यासच कार्यक्षम सेवाज्येष्ठ उपशिक्षकाची केंद्र संचालक म्हणून नियुक्ती करण्यात यावी. एकदा नियुक्त केलेल्या केंद्र संचालकांच्या नावात शक्यतो बदल करण्यात येऊ नये, तसेच उपकेंद्रसंचालक, पर्यवेक्षक, शिपाई यांची नियुक्ती करण्यासंदर्भातील सूचनाही देण्यात आल्या आहेत.